❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २८४ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

नाना पाटेकर यांचे आयुष्यात फक्त दोनच गुरु होते, कधीच विसरले नाहीत

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचं आज निधन झालं आहे. वयाच्या 75 व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गोव्यामध्ये नाना पाटेकर यांचं निधन झालं. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण सिनेसृष्टीवर आणि महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. नाना पाटेकर हे केवळ एक कलाकारच नव्हते, तर त्यांनी नाम फांउडेशनच्या माध्यमातून राज्याच्या दुष्काळी भागात अनेक मोठी समाजोपयोगी कामं केली होती. नाना पाटेकर हे एक उत्तम कलाकार होते, त्यांनी आपल्या अभिनयाच्या जोरावर अनेक चित्रपट अजरामर केले. नाना पाटेकर एकदा बोलताना म्हणाले होते की, माझे फक्त दोनच गुरू आहेत, एक भूक आणि दुसरा गुरू म्हणजे अपमान. नाना पाटेकर यांनी ज्या -ज्या चित्रपटांमध्ये गरिबी राग आणि संघर्ष साकारणाऱ्या भूमिका केल्या, त्या चित्रपटांमध्ये ते भूमिका साकारण्यासाठी कधीही केवळ अभिनयाच्या तंत्रांवर अवलंबून राहिले नाहीत तर त्या पात्रामध्ये जी अस्वस्थता दिसून आली, ती अस्वस्थता नाना पाटेकर यांच्या वैयक्तिक आयुष्यातून आलेली होती. ज्यामध्ये आपल्याला परिंदा, अंकुश, क्रांतीवीर यासारख्या काही चित्रपटांची उदाहरणं देता येतील. हे सर्व चित्रपट नाना पाटेकर यांच्या अभिनयाने सुपहीट ठरले. नाना पाटेकर सुरुवातीला फक्त नाटकांमध्येच भूमिका करायचे. परंतु अभिनेत्री स्मिता पाटील या नाना पाटेकर यांच्या चांगल्या मैत्रिण होत्या. नाना पाटेकर यांना फक्त नाटकांमध्येच भूमिका करायला आवडायचं, परंतु स्मिता पाटील यांची अशी इच्छा होती की, नाना पाटेकर यांनी चित्रपटांमध्ये देखील काम करावं. एका दैनिकाच्या रिपोर्टनुसार स्मिता पाटील या कायम नाना पाटेकर यांनी चित्रपटात काम करावं यासाठी प्रयत्न करायच्या. चित्रपटाच्या माध्यमातून तुम्ही एकाचवेळी अनेक लोकांपर्यंत पोहचू शकता, असं स्मिता पाटील त्यांना नेहमी सांगायच्या. त्यांनी नाना यांना चित्रपटात काम मिळावं यासाठी प्रयत्न केला, त्यांनी एका भूमिकेसाठी नाना यांचं नाव निर्माते रवी चोपडा यांना सूचवलं होतं. परंतु सुरुवातीला नाना पाटेकर यांनी रवी चोपडा यांच्या चित्रपटात भूमिका करण्यास नकार दिला होता.





रंगभूमी आणि चित्रपट क्षेत्रात अभिनयाची उत्तुंग शिखरे गाठणाऱ्या, संवादफेकीपासून मुद्राभिनयापर्यंत प्रत्येक बाबतीत स्वतःची स्वतंत्र शैली निर्माण करणाऱ्या व प्रखर सामाजिक जाणिवा जपणाऱ्या नाना पाटेकर यांचे अकल्पित निधन हा चित्रपटसृष्टीसाठी, महाराष्ट्रासाठी आणि वैयक्तिक माझ्यासाठी फार मोठा धक्का आहे. गेल्याच आठवड्यात अनंत चतुर्थीच्या दिवशी नानांच्या पुण्याच्या घरी गणपती दर्शनाच्या वेळेस झालेली भेट ही शेवटची ठरली. नाना पाटेकर हे अभिनयाची एक जिवंत शाळा होते. 'नटसम्राट' चित्रपटातील त्यांचे संवाद आजही प्रेक्षकांच्या कानात घुमतात. चित्रपटाच्या पडद्यावर ते जितके भारदस्त असायचे, तितकेच खऱ्या आयुष्यात ते अत्यंत साधे आणि जमिनीवर असणारे व्यक्ती होते. नाना पाटेकर यांनी 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून शेतकरी आणि दुष्काळग्रस्त कुटुंबांसाठी केलेले काम विशेष उल्लेखनीय आहे. संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना आधार देण्यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेतला. समाजातील सामान्य माणसाशी त्यांची नाळ कायम जोडलेली होती.

- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



भारतीय चित्रपटसृष्टी आणि रंगभूमीवर आपल्या अजोड, दमदार अभिनयाचा ठसा उमटवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आणि मनाला चटका लावणारी आहे. त्यांच्या जाण्याने मराठी तसेच भारतीय कलाविश्वाने एक हरहुन्नरी आणि संवेदनशील कलाकार गमावला आहे. नाना पाटेकर हे केवळ एक उत्कृष्ट अभिनेते नव्हते, तर अभिनयाचा अस्सल आविष्कार आणि संवेदनशील सामाजिक जाणिवांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता. रंगभूमीपासून रुपेरी पडद्यापर्यंत आपल्या सहज आणि प्रभावी अभिनयाने त्यांनी अनेक व्यक्तिरेखा अजरामर केल्या. 'नटसम्राट', 'क्रांतिवीर', 'परिंदा' यांसारख्या कलाकृतींमधून त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीवर उमटवलेली अमीट छाप रसिकप्रेक्षकांच्या मनात सदैव कायम राहील. नाना पाटेकर आणि पवार कुटुंबातील आपुलकीच्या संबंधांचा उल्लेख करताना सुनेत्रा पवार यांनी नानांचे आदरणीय अजितदादांशी अतिशय जिव्हाळ्याचे, आपुलकीचे आणि स्नेहाचे संबंध होते. कौटुंबिक सुख-दुःखाच्या प्रत्येक प्रसंगात ते नेहमी पाठीशी उभे राहिले.

- उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

‘माझ्या सरणासाठी सुकी लाकडं काढून ठेवली आहेत’

नाना पाटेकर यांच्यावर डोणजे गावात अंत्यसंस्कार

■ पुणे (दै. संध्या)

आपल्या दमदार अभिनयाने मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीवर अमीट ठसा उमटविणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना आज पुण्याजवळील डोणजे येथील त्यांच्या फार्महाऊसवर शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला. वयाच्या ७५व्या वर्षी नाना पाटेकर यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एका असामान्य पर्वाचा अंत झाला. गोव्यातील डोना पाउला येथील निवासस्थानी हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यानंतर नाना पाटेकर यांना मणिपाल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार करण्याचे शर्थीचे प्रयत्न केले; मात्र गुरुवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची बातमी समोर येताच मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीसह त्यांच्या असंख्य चाहत्यांमध्ये शोककळा पसरली. नाना पाटेकर यांचे पार्थिव गोव्यातील वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुण्याकडे रवाना करण्यात आले. त्यानंतर त्यांचे पार्थिव डोणजे येथील फार्महाऊसवर आणण्यात आले. येथे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार, कलाकार आणि असंख्य चाहत्यांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. मराठी रंगभूमीपासून सुरू झालेला नाना पाटेकर यांचा प्रवास हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील अत्यंत प्रभावी अभिनेत्यापर्यंत पोहोचला. ‘परिंदा’, ‘क्रांतिवीर’, ‘खामोशी’, ‘अब तक छप्पन’, ‘नटसम्राट’ यांसारख्या विविध चित्रपटांमधून त्यांनी आपल्या अभिनयाची वेगळी ओळख निर्माण केली. नायक, खलनायक, चरित्र भूमिका किंवा विनोदी भूमिका असो, प्रत्येक व्यक्तिरेखेला त्यांनी स्वतःची छाप दिली. अभिनयाबरोबरच सामाजिक कार्यातही नाना पाटेकर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. ‘नाम फाउंडेशन’च्या माध्यमातून त्यांनी शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविले. आज डोणजेच्या मातीत या महान कलाकाराला अखेरचा निरोप देताना उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू आणि मनात नानांच्या असंख्य आठवणी होत्या. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, भारतीय चित्रपट सृष्टीतील दिग्गज अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाचे वृत्त अतिशय धक्कादायक आणि दुःखद आहे. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. नानांचे आणि माझे अतिशय जवळचे आणि मैत्रीपूर्ण संबंध होते. आपल्या दमदार अभिनयाने पाच दशकांहून अधिक काळ नाना पाटेकर यांनी मराठी व हिंदी चित्रपटांच्या माध्यमातून रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण संवाद शैलीने त्यांनी चित्रपटातील अनेक पात्रे अजरामर केली व आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचे जाणे ही भारतीय चित्रपटसृष्टीची मोठी हानी आहे. 'नाम फाऊंडेशन'च्या माध्यमातून पाणी संरक्षण, संचयन क्षेत्रांत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आणि महत्त्वपूर्ण आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी त्यांनी दिलेला मदतीचा हात अनेक कुटुंबांचा आधार बनला. नाना एक उत्तम कलाकार-अभिनेते असण्याबरोबरच समाजाप्रती संवेदनशील असलेले एक व्यक्तिमत्त्व होते. ईश्वर दिवंगत आत्म्यास शांती प्रदान करो. ॐ शांती. आमदार रोहित पवार म्हणाले की, सामाजिक जाण आणि भान असलेले ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचं हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याचं वृत्त अत्यंत धक्कादायक आणि मन सुन्न करणारं आहे. त्यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीने एक संवेदनशील, प्रभावी आणि अष्टपैलू कलाकार गमावला आहे.‘परिंदा’, ‘क्रांतिवीर’, ‘प्रहार’, ‘खामोशी’, ‘अग्निसाक्षी’, ‘नटसम्राट’, ‘वेलकम’ यांसारख्या असंख्य चित्रपटांमधून त्यांनी आपल्या दमदार अभिनयाची अमीट छाप उमटवली. पडद्यावरील अभिनयासोबतच 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून शेतकरी, दुष्काळग्रस्त आणि ग्रामीण भागातील जनतेसाठी केलेले त्यांचं सामाजिक कार्य त्यांच्या संवेदनशील मनाची साक्ष देणारं आहे.

आमच्या डोक्यावरचा हंडा नाना पाटेकर यांच्यामुळे खाली आला

नाना पाटेकर यांच्या नाम फाउंडेशनने धाराशिवमधील वाटवडा हे गाव पाच वर्षे दत्तक घेतलं होतं. नाना पाटेकर यांच्या आठवणीत महिला भाऊक झाल्या आहेत. आमच्या डोक्यावरचा हंडा नाना पाटेकर यांच्यामुळे खाली आला. आज दुष्काळातही नाम फाउंडेशनने जलसंधारणाची काम केले, त्यामुळे पाणी टिकून आहे. पाण्याच्या थेंबा थेंबात आम्हाला नानांची आठवण येत राहील अशा भावना महिलांनी व्यक्त केल्या. एवढा मोठा अभिनेता आमचं गाव दत्तक घेतलं. ते आमच्या कुटुंबातीलच व्यक्ती वाटत होते असे महिलांनी सांगितले.

नाना पाटेकर यांच्या आठवणीत गावकरी भावूक

नाना पाटेकर खऱ्या अर्थाने नटसम्राट होते. त्यांची शेतकऱ्यासोबत, मातीशी बांधिलकी होती. नाना पाटेकर आज आपल्यात नाहीत हे वाटतच नाही. विधवा महिलांना आर्थिक मदत, शेतकऱ्यांना बी बियाणे वाटप, शिलाई मशीनचे ट्रेनिंग घेऊन त्यांनी महिला स्वावलंबी केल्या असे म्हणत नाना पाटेकर यांच्या आठवणीत गावकरी भावूक झाले.

मराठवाड्यात आज नानांच्या कामांची आठवण

पाण्याच्या थेंबा थेंबात आम्हाला नानांची आठवण येईल. नानांमुळे आमच्या डोक्यावरचा हंडा खाली आला या भावना धाराशिवच्या वाटवडा येथील महिलांनी व्यक्त केल्या. दुष्काळात पिचलेल्या मराठवाड्यात नाना पाटेकरांनी नाम फाउंडेशनच्या माध्यमातून रचनात्मक काम केलं. जलसंधारणाचे कामं केली. महिला शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी शिलाई मशीन दिल्या. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबालाही आर्थिक आधार दिला. धाराशिव जिल्ह्यातलं वाटवडा गाव हे नाम फाउंडेशनने दत्तक घेतलं होतं. नाना पाटेकर आपल्यात नाहीत. मात्र त्यांच्या आठवणीने गावकरी भावुक झाले आहेत. नाम फाउंडेशनने काम केलं, त्यामुळं आमच्या डोक्यावरला हंडा खाली आला आहे. नाहीतर आम्हाला पाण्यासाठी भटकंती करावी लागत होती. आज दुष्काळातही पाणी टिकून आहे ते फाउंडेशनच्या कामामुळे.

नाना नटसम्राट होते कारण त्यांची बांधिलकी ही शेती मातीशी होती

नाना नटसम्राट होते कारण त्यांची बांधिलकी ही शेती मातीशी होती. आज आमच्या कुटुंबातील एक व्यक्ती गेल्याची भावना होत असल्याचं वाटवड्यातील महिलांनी सांगितलं. नाना पाटेकर यांच्या आठवणीत महिला भावूक झाल्याचे पाहायला मिळालं.

नटसम्राट नानांची आकस्मिक ‘एक्झिट’ धक्कादायक; अभिनय, संवेदनशीलतेचा भारदस्त चेहरा काळाच्या पडद्याआड



■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना श्रद्धांजली

भारतीय चित्रपटसृष्टीचा अभिनय आणि संवेदनशीलतेचा भारदस्त चेहरा ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनामुळे काळाच्या पडद्याआड गेला आहे. नटसम्राट नानांची अशी आकस्मिक एक्झिट धक्कादायक आहे, अशी शोकमग्न भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून नाना पाटेकर यांनी घेतलेली भूमिका कलाक्षेत्रासह, अनेकांना सामाजिक बांधिलकीचा धडा घालून देणारी ठरली आहे. त्यांच्या निधनामुळे कला आणि सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, असे नमूद करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, स्नेही, मित्र म्हणून ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे घट्ट ऋणानुबंध राहीले आहेत. भारतीय चित्रपट सृष्टीला नानांच्या रुपाने मराठी मातीतील रांगडा, पण तितकाच संवेदनशील असा अभिनेता मिळाला. नाना जितके पडद्यावर मोठे, तितकेच मनाने सुद्धा मोठे होते. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला त्यांनी एक कालखंड दिला. त्यातून प्रामुख्याने एक राष्ट्रभक्त अशीच त्यांची प्रतिमा प्रेक्षकांना भावली. 'क्रांतिवीर' ते 'नटसम्राट' या त्यांच्या प्रवासात जो दमदार आणि कसदार अभिनयाचा पट त्यांनी उभा केला, त्याला तोड नाही. त्यामुळे अभिनेता म्हणून त्यांचे जाणे ही मोठी हानी आहे. नाना जिथे जात तिथे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, स्वभावाचा भारदस्तपणा वातावरण भारून टाकत. नानांचे अस्तित्त्व त्या परिसराला व्यापून टाकत असे. नाना सर्वांशीच हक्काने आणि वडिलकीच्या, मार्गदर्शकाच्या नात्यानं बोलत असत. त्यामध्ये आत-बाहेर असा भाव नसे. त्यामुळे त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधता येत असे. परखडपणा, बेधडकपणा हे स्वभावगुण त्यांचे व्यक्तिमत्त्व खुलवणारे ठरले. मी मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांच्यातील हळवा माणूस कायम पाहत आलो आहे. आम्ही जलयुक्त शिवार अभियान हाती घेतले, तेव्हा त्याला पाठिंबा देण्यासाठी स्वतः नाना पुढे आले होते. मकरंद अनासपुरेजी आणि त्यांनी सोबत येत 'नाम फाऊंडेशन'ची स्थापना केली आणि स्वतः शिवारात जाऊन काम केले. शेतकऱ्यांसाठी मदत करणे असो, दुष्काळी कालखंडात मदतीचा हात पुढे करणे असो, नाना कायम अग्रणी राहिले. यंदाही आपण दुष्काळाचा सामना करीत असताना नाना कधीच मागे राहिले नसते, पण ते अचानक सोडून निघून गेले. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. पाटेकर कुटुंबियांच्या, नानांच्या चाहत्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.



संपादकीय

पडदा खाली आला अन् शेवटी नटसम्राट थांबला

कधी कधी वाटतं नाना असा गप गुमान नाही जाऊ शकत... हार्ट अटॅक वगैरे गोष्टी नानासाठी नव्हत्या असंच वाटायचं!... खादीच्या पेहेरावात आणि एक आरपार जाणाऱ्या नजर असलेल्या नानाला हार्ट अटॅक कसा येऊ शकतो?..... भरपूर व्यायाम आणि मनसोक्त जीवन जगणाऱ्याला अटॅक येत नाही असं तर ऐकलंच होतं... जे जे स्कूल ऑफ आर्टच्या आवारात बिनदिक्कत फिरणारा कलासक्त विद्यार्थी म्हणून नानाची सर्वसामान्यांना पहिली ओळख... छबिलदास मध्ये. पाहिजे जातीचे... या प्रयोगाची तिकीट खालच्या मजल्यावर स्वतः विकत बसलेला नाना मुंबईकरांनी पाहिलेला आहे!..... तिकीट विकता विकता झटकन दुसऱ्या मजल्यावर जाऊन नाना नाटकात "बबन्या" कधी व्हायचा हे कोणालाच कळायचं नाही!... आणि हा बबन्या मनात कधी ठसला ते कळलच नाही!... महासागर मध्ये दिसला. तो एलआयसी एजंट म्हणून.. भोकं असलेलं बनियन घालून तो प्रेक्षकांशी बोलताना तो स्टेजवरुन बाजूच्या खुर्चीत असल्यासारखा वाटायचा!... हमीदाबाईच्या कोठीतला उक्कड बसणारा आणि पडेल ते काम करणारा "सत्तार" म्हणून दिसला आणि बाहरवाला नाना आतला आणि आपला झाला!.... पुरुष मधला नाना "क्रूर "शब्दाला ही लाजवणारा पूर्ण पुरुषच भासला.... हनुमानाने जशी सूर्याकडे जन्मल्यावर उडी मारली असेल तशी उडी मारून नाना आपल्यातून निघून गेला!.....

ज्येष्ठ अभिनेते नटसम्राट नाना पाटेकर यांना अखेरचा सलाम

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनयाचा एक धगधगता अध्याय काल गोवा येथे काळाच्या पडद्याआड गेला. आपल्या अस्सल अभिनयाने, भारदस्त आवाजाने, डोळ्यांतून भावना व्यक्त करण्याच्या विलक्षण शैलीने आणि प्रत्येक भूमिकेला जिवंत करण्याच्या सामर्थ्याने लाखो प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने कला क्षेत्रावर आणि त्यांच्या असंख्य चाहत्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. नाना पाटेकर हे केवळ अभिनेते नव्हते. ते अभिनयाची एक स्वतंत्र शाळा होते. नानांनी पडद्यावर व नाटकाच्या रंगमंचावर साकारलेली प्रत्येक पात्र.भूमिका जणू त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक वेगळा पहिला पैलू बनून समोर यायचा.

क्रांतिवीर, परिंदा, अग्निसाक्षी, अब तक छप्पन, नटसम्राट. अंकुश यांसारख्या असंख्य चित्रपटांमधून त्यांनी आपल्या अभिनयाची ताकद सिद्ध केली. त्यांच्या अभिनयात दिखावा नव्हता.होती ती सहजता, तीव्रता आणि माणसाच्या भावविश्वाला भिडण्याची ताकद. त्यांच्या कारकिर्दीत त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांसह अनेक मान-सन्मान मिळाले. आणि सन २०१३ मध्ये त्यांना पद्मश्रीने गौरविण्यात आले. नाना म्हणजे रांगडा आवाज तितका संवेदनशील मनाचा कलाकार त्यांच्या संवाद फेकीतला ठाम पणा आणि अभिनय अभिनयातील प्रामाणिकपणा प्रेक्षकांच्या मनात कायमचा घर करून गेला. त्यांच्या चेहऱ्यावरचा राग, डोळ्यांतील वेदना, ओठांवरचे उपरोधिक हास्य किंवा संवादातील आक्रमकता—प्रत्येक गोष्ट पडद्यावर खरी वाटायची. नानांचा एक प्रसंग कायम स्मरणात राहील हा प्रसंग एखाद्या सिनेमातला नाही ही गोष्ट आहे नाना पाटेकर आणि अशोक सराफ यांच्या गाढ मैत्रीची आज नाना पाटेकर आणि अशोक सराफ दोघेही अभिनयाच्या क्षेत्रात दिग्गज म्हणून ओळखले जात होते.पण एक काळ असा होता जेव्हा नाना पाटेकर संघर्ष करत होते. पैशाची चणचण होती. काम होतं पण हातात पैसा टिकत नव्हता. आणि अशाच काळात त्यांच्या आयुष्यात एक मित्र देवदूतासारखा समोर उभा राहिला. त्याचं नाव.. अशोक सराफ. हमिदाबाईची कोठी या नाटकाच्या काळात दोघांची घट्ट मैत्री झाली त्यावेळी नानांना प्रयोगाचे पन्नास रुपये तर अशोकमामाना अडीचशे रुपये मिळायचे.नाटकाचे प्रयोग नसताना दोघे पत्ते खेळायचे. पण या खेळात वेगळाच खेळ चालायचा... अशोक सराफ मुद्दाम हरायचे !... पाच -दहा रुपये नानाच्या हातात जायचे. नानाना हे कळायचे की... अशोक मुद्दाम हरतोय पण नानांना पैशाची गरज होती. म्हणून तेही ते पैसे घ्यायचे कारण काही माणसं मदत करताना समोरच्याचा स्वाभिमान जपत असतात. अशोक सराफही तसेच करत होते. पण एक दिवस अशी परिस्थिती झाली की नानांना खरोखर पैशाची गरज पडली. गणपतीचे दिवस होते घरात फुलाचा खर्च होता. पण नानाच्या खिशात पैसे नव्हते. सकाळची वेळ अशोक सराफ फिल्म सिटीला शूटिंगसाठी निघाले होते.जाताना ते नानाच्या माटुंग्यातल्या घरी गेले. दारावर टकटक केले नानांनी दार उघडले. समोर अशोक सराफ आणि मामानी नानाच्या हातात एक कोरा चेक ठेवला. आणि म्हणाले माझ्या खात्यात १५ हजार रुपये आहेत. तुला पाहिजे तेवढे काढून घे. ना कसलं स्पष्टीकरण... ना कसलं कर्जाचे बोलणं.... ना सहीची हमी...ना परत कधी देणार?.... याचा सवाल... फक्त मित्रावर गाढ विश्वास....नानांनी त्या चेक मधून फक्त तीन हजार रुपये काढले.आणि विशेष म्हणजे अशोक सराफ यांनी नंतर कधीही त्या पैशाचा हिशोब मागितला नाही. काही दिवस नाही. काही महिने नाही कित्येक वर्ष काळ पुढे सरकत गेला. नाना पाटेकर मोठे होत गेले. नानांचा करिष्मा वाढला. नानांना मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीत मोठ्या प्रमाणावर कामे मिळू लागली. नानांची आर्थिक परिस्थिती सुधारली आणि एक दिवस नाना पाटेकरांनी अशोक सराफांचे तीन हजार रुपये त्यांच्या हातावर परत ठेवले अशोक सराफ यांनी पैसे हातात घेतले. आणि नानांकडे पाहून मिश्किलपणे म्हणाले काय पाटेकर पैसेवाले झाले तुम्ही?...नानांनी दिलेले उत्तर मात्र आजही या मैत्रीची खरी श्रीमंती सांगून जाते पैसेच परत करतोय!... वेळ नाही परत करू शकत!.... काय भन्नाट वाक्य आहे ना!... पैसे परत करता येतात पण गरजेच्या वेळी एखाद्याने दिलेला आधार. विश्वास. आणि साथ.... त्याची परतफेड करता येत नाही. आणखी एक छोटासा किस्सा नाना पाटेकरांनी सांगितलं होतं... हमीदाबाईची कोठीच्या नाटकाच्या दौऱ्यावर असताना नाना अशोक सराफ यांचे पाय चेपायचे. डोक्याला तेल लावून मालीश करायचे. त्या बदल्यात अशोक सराफ त्यांना पाच रुपये द्यायचे. नानाच्या आयुष्यात त्या पाच रुपयाची किंमत मोठी होती. म्हणूनच आज परिस्थिती बदलली. प्रसिद्धी आली. पैसा आला....तरी नाना त्या जुन्या दिवसांना विसरले नाहीत. नाना म्हणतात की आजही अशोक सराफ भेटले की नाना त्याचे पाय चेपायचे.आणि अशोक मामा त्यांना म्हणायचे.. ए नाना गाढवा असं करू नकोस.... खरं तर ही गोष्ट ३००० रुपयाची नाही. ही गोष्ट आहे गाढ निखळ मोकळ्या मनाच्या मैत्रीची. विश्वासाची. स्वाभिमानाची. आणि गरजेचे वेळी न बोलावता मदतीला धावून जाण्याची!....आजच्या काळात हजारो रुपयांची मदत करून त्याचा फोटो काढणारे अनेक जण भेटतील.आपल्याला अशी मंडळी सोशल मिडीयावर शेकड्यानी भेटत आहे.पण स्वतःच्या खात्यातील पंधरा हजार रुपयांच्या कोरा चेक मित्राच्या हातात देऊन तुला पाहिजे तेवढे काढून घे?असे म्हणणारा मित्र मिळणे हीच खरी श्रीमंती!... आणि म्हणूनच नाना पाटेकर आणि अशोक सराफ यांची मैत्री आजही इतकी खास वाटते कारण काही नाती पैशाने श्रीमंत होत नाही ती माणुसकीने श्रीमंत होतात नाना आणि अशोक मामा पडद्यावरचे दिग्गज अभिनेते पण आयुष्यात एकमेकाचे खरे मित्र होते. नाना पाटेकर यांची ओळख केवळ रुपेरी पडद्यापुरती मर्यादित नव्हती. समाजातील सामान्य माणसाच्या वेदनेशी त्यांचे नाते होते. महाराष्ट्रातील शेतकरी आणि गरजूंसाठी त्यांनी केलेले सामाजिक कार्य त्यांच्या संवेदनशील मनाची साक्ष देते. प्रसिद्धीपासून दूर राहून मदतीचा हात पुढे करणारा हा कलाकार म्हणूनही ते अनेकांच्या स्मरणात राहतील. नटसम्राट नानांचा आवाज आज शांत झाला आहे.....

पण त्यांनी साकारलेली पात्रे शांत होणार नाहीत.

त्यांचे संवाद पुन्हा पुन्हा कानावर पडतील, त्यांच्या भूमिका पुन्हा पुन्हा डोळ्यांसमोर येतील आणि प्रत्येक वेळी जाणवेल—हा कलाकार किती मोठा होता!

काही कलाकार पडद्यावर येतात आणि निघून जातात;

पण काही कलाकार पडदा संपल्यानंतरही मनात जिवंत राहतात.

नाना पाटेकर हे त्यापैकीच एक.

त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. भारतीय चित्रपटसृष्टीने एक असामान्य कलाकार गमावला आहे, तर रसिकांनी आपला लाडका आणि मनस्वी कलाकार गमावला आहे.

नाना पाटेकर यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन!

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना, आप्तेष्टांना व असंख्य चाहत्यांना हे दुःख सहन करण्याचे बळ देवो.

शिक्षकांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारे नेतृत्व : प्राचार्य नंदकुमार सागर

शिक्षकांच्या प्रश्नांसाठी प्राचार्य नंदकुमार सागर यांची उमेदवारी चर्चेत

■ पुणे (दै. संध्या)



पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या उमेदवारीची शिक्षक व शैक्षणिक क्षेत्रात चर्चा सुरू आहे. शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने भूमिका मांडणारे नेतृत्व म्हणून त्यांच्या समर्थकांकडून त्यांच्या उमेदवारीचे समर्थन केले जात आहे.

शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत असलेल्या प्राचार्य नंदकुमार सागर यांनी शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत योगदान दिल्यानंतर प्राचार्य म्हणून शैक्षणिक तसेच प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव म्हणूनही त्यांनी काम केले असून, या माध्यमातून मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांशी त्यांचा सातत्याने संपर्क आला आहे.

शिक्षकांच्या सेवा-सुरक्षा, वेतन, पदोन्नती, वरिष्ठ वेतनश्रेणी, अनुदान, शाळांचे अस्तित्व, मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय अडचणी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांना शासन दरबारी प्रभावीपणे मांडण्याची गरज असल्याची भूमिका त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे. बदलत्या शैक्षणिक धोरणांमुळे शाळा, शिक्षक आणि शिक्षण व्यवस्थेसमोर निर्माण होणाऱ्या नव्या आव्हानांवरही विधानपरिषदेत शिक्षकांचा आवाज बुलंद करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांच्या प्रचारातून अधोरेखित केले जात आहे. पक्षीय राजकारणापेक्षा शिक्षकांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारे नेतृत्व असावे, अशी भूमिका त्यांच्या समर्थकांकडून मांडली जात आहे. प्राचार्य सागर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन समर्थकांकडून मितभाषी, अभ्यासू आणि संघटनात्मक कामाचा प्रदीर्घ अनुभव असलेले नेतृत्व म्हणून केले जात आहे. शिक्षकांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेऊन त्या शासनाच्या संबंधित स्तरावर मांडण्याच्या उद्देशाने त्यांनी निवडणुकीच्या रिंगणात प्रवेश केल्याचे त्यांच्या प्रचारातून सांगण्यात येत आहे.

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या पाच जिल्ह्यांतील शिक्षक मतदारांचा सहभाग असणार आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध उमेदवारांकडून शिक्षकांच्या प्रश्नांवर आपापल्या भूमिका मांडल्या जात असून, आगामी निवडणुकीत शिक्षक मतदार कोणत्या मुद्द्यांना आणि कोणत्या प्रकारच्या नेतृत्वाला प्राधान्य देतात, याकडे शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे. दरम्यान, शिक्षकांच्या प्रश्नांना विधानपरिषदेत प्रभावी व्यासपीठ मिळावे आणि शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समस्या शासनाच्या पातळीवर ठामपणे मांडल्या जाव्यात, या उद्देशाने प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या उमेदवारीला पाठिंबा देण्याचे आवाहन त्यांच्या समर्थकांकडून करण्यात येत आहे.

कांता (भक्ती) जाधव यांना उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार

■ नारायणगाव (दै. संध्या)



सावरगाव सासर असणाऱ्या सौ. कांता (भक्ती) लालचंद जाधव यांना 'उत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार ' म्हणून द युवा ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने २९ सप्टेंबर २०२६ रोजी श्रीनाथ महाराज गोसावी शांतीब्रम्ह एकनाथ महाराज यांचे १४ वे वंशज ह भ प रमेश महाराज वसेकर व श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचे १८ वे वंशज पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अन्सार शेख, राज्याचे अध्यक्ष शकील मणियार आणि जिल्हा अध्यक्ष काशिनाथ आल्हाट यांचे शुभ हस्ते आळंदी येथे प्रदान करण्यात आला. कांता जाधव यांचा नवीन चित्रपट ' सरपंच द पॉवर मॅन' हा दिनांक २३ ऑक्टोबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील चित्रपट गृहात प्रदर्शित होत आहे . या चित्रपटात अभिनेत्री कांता जाधव यांनी आपल्या दमदार अभियानाद्वारे उत्कृष्ट भूमिका केली आहे .ह्या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती शरद रासकर सरचिटणीस भाजपा शिरूर तालुका तसेच पत्रकार काशिनाथ आल्हाट आणि सरपंच दि पॉवर मॅन या चित्रपटातील दिग्दर्शक प्रशांत जाधव ,अभिनेता महादेव जाधव, अभिनेत्री कशिश पाटील आणि सरपंच चित्रपटाचे सर्व कलाकार उपस्थित होते.

विघ्नहर कारखान्याच्या ४१व्या गळीत हंगामाचा शुभारंभ

■ नारायणगाव (दै. संध्या)



श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२६-२७ या ४१व्या गळीत हंगामाचा शुभारंभ शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार दिलीपराव ढमढेरे, अतुलशेठ बेनके, जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजयशेठ काळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत गव्हाणीत ऊसाची मोळी टाकून करण्यात आला. यावेळी उपस्थित सभासद शेतकऱ्यांशी संवाद साधताना सत्यशील शेरकर यांनी सध्याच्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीसमोर निर्माण झालेल्या अडचणींवर भाष्य केले. हवामानातील बदल, वाढता उत्पादन खर्च आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेतकरी अडचणीत आहे. जुन्नर तालुक्यातील काही भागात दुष्काळी परिस्थिती असल्याने ऊसासह इतर पिकांच्या उत्पादनावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच कारखान्याचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे.

साखर उद्योगावरही नैसर्गिक आपत्ती आणि शासनाच्या धोरणांचा परिणाम होत असून, अशा आव्हानात्मक परिस्थितीत कारखान्याचे संचालक मंडळ शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रयत्नशील असल्याचे शेरकर यांनी सांगितले. यंदा ऊसाची उपलब्धता कमी होण्याची शक्यता लक्षात घेता इतर कारखान्यांकडून ऊस मिळविण्याचे प्रयत्न होणार आहेत. मात्र, सभासद शेतकऱ्यांनी आपला ऊस विघ्नहर कारखान्यालाच द्यावा, असे आवाहन करण्यात आले. यंदा १० लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, शेतकी विभागाकडून ऊसतोडणीचे नियोजन काटेकोरपणे करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या ऊसाची वेळेत तोडणी करून योग्य बाजारभाव मिळवून देण्यासाठी कारखाना प्रयत्नशील राहणार असल्याचेही सांगण्यात आले.

महिलांनी स्वतःच्या पायावर उभ राहणं हीच खरी सक्षमतेची ओळख : सौ. रोहिणी शिंदे

■ बदलापूर (दै. संध्या)



जनजागृती सेवा संस्थेच्या ग्रुप सदस्यांनी कुळगाव बदलापूर नगरपरिषद आणि ॐग्रामण्ये इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनल एक्सलेन्स यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत महिला शिबिराला भेट देऊन माहिती जाणून घेतली.

महिला नेहमीच कुटुंबासाठी पुढाकार घेवून झटत असतात, पुरुषांची मक्तेदारी असलेली सगळी क्षेत्रे महिलांनी काबीज केली आहेत. पुरुषांपेक्षा महिला जास्त कार्यक्षम आहेत. पुरुषांच्या तुलनेत जास्त काम करतात आणि त्यांचा मान सन्मान त्यांना मिळाला पाहिजे असे मत जनजागृती सेवा संस्थेचे जेष्ठ सल्लागार आणि समता साहित्य अकादमीचे महाराष्ट्र अध्यक्ष श्रीयुत दिलीप नारकर यांनी केले.

श्रीयुत सुहास सावंत यांनी महिलांना डिजिटल माध्यमे आणि सोशल एप्सचा वापर करून आपला व्यवसाय वेगळ्या ऊंचीवर घेवून जाण्याबाबत मार्गदर्शन केले.मनात आणल तर आपण कोणतीही गोष्ट करु शकणाऱ्या याच जिवंत उदाहरण म्हणजे प्रशिक्षणासाठी वेळात वेळ काढून उत्स्फूर्तपणे सहभागी झालेल्या या सर्व महिला आपल्या इच्छेला दिशा देऊन नवनव्या गोष्टी आणि व्यवसायातील गमके समजून घेवून, हे प्रशिक्षण घेवून पुढे आपण आपल्या व्यवसायाची प्रगती कशी करू शकतो याचा विचार करणे आणि आपल्या इच्छेला दिशा देऊन नवीन गोष्ट शिकण्याची तयारी ठेवून आणि हे प्रशिक्षण घेतल्यानंतर आपण पुढे काय करु शकतो?याचा विचार करण हीच खरी प्रगतीची सुरुवात आहे.असे मत सोहम इको सोल्युशनच्या संस्थापिका सौ. रोहिणी शिंदे यांनी मांडले.

याप्रसंगी शिवण कामातील विविध प्रकार यासंदर्भात शिक्षिका राणी सचिन भंडारे, मिनाक्षी शदर वाघमारे, ज्योती सागवेकर यांनी बेसिक माहिती सांगितली.तसेच यावेळी जनजागृती ग्रुप सदस्या(संचालिका-सोहम इको सोल्युशन, घनकचरा व्यवस्थापन समुपदेशिका) रोहिणी प्रशांत शिंदे मॅडम यांनी महिलांना शिवणकाम त्यातील बारकावे अशी विविधांगी सविस्तर उपयुक्त माहिती त्यांनी महिलांना दिली.त्याच प्रमाणे जनजागृती सदस्य दिलीप नारकर(अध्यक्ष-समता साहित्य अकादमी महाराष्ट्र), जनजागृती ग्रुप सदस्य सुहास सावंत(अध्यक्ष-उमेद बहुउद्देशीय सामाजिक संस्था), जनजागृती ग्रुप सदस्य राजेंद्र नरसाळे(सचिव-सिटीझन वेल्फेअर असोसिएशन, बदलापूर) यांनीही मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी केले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ॐग्रामण्ये इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनल एक्सलेन्सचे डायरेक्टर शिवराम चव्हाण सर, प्रकल्प अधिकारी प्रविण कुंभार सर यांचे मार्गदर्शन लाभले.विशेष म्हणजे कुळगाव बदलापूर नगरपरिषद आयोजित महिला बालकल्याण योजनेअंतर्गत मोफत महिला प्रशिक्षण शिबीरासाठी नगरसेवक किरण भोईर यांच्या विशेष मार्गदर्शन व सहकार्याने हे मोफत महिला प्रशिक्षण शिबीर आनंद दिघे भाजी मार्केट,सहकार हॉटेलच्या मागे, बदलापूर पश्चिम येथे सुरु आहे.

या मोफत महिला प्रशिक्षणासाठी महिला व बाल कल्याण अधीक्षक मा.श्रीकांत निकुळे याचे बहुमोल सहकार्य लाभत आहे.

मोफत कृत्रिम अवयव शिबीराचे आयोजन

■ आळंदी (दै. संध्या)

भारत विकास परिषद कोथरूड शाखा व भारत विकास परिषदेचे दिव्यांग पुनर्वसन केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदीच्या सहयोगाने आळंदीत दिव्यांगांना आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पाय, हात व पोलिओ कॅलिपर मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. कै. आमोद पानसे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पत्नी श्रीमती शुभलक्ष्मी पानसे यांच्या देणगीतून हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शुक्रवार (दि. २३ ऑक्टोबर) रोजी हराळे वैष्णव समाज धर्मशाळा, पितळे गणपती मंदिराजवळ, समाधी मंदिर महाद्वाराजवळ, आळंदी येथे शिबिर होणार आहे. शिबिराच्या नियोजनासंदर्भात ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, दिव्यांग ट्रस्ट पुणेचे अध्यक्ष दत्ताजी चितळे, विनय खटावकर, भारत विकास परिषद कोथरूड शाखेच्या कोषाध्यक्ष सुधीरा अभ्यंकर आदींनी माहिती दिली.

सात कोटींचा निधी मंजूर

■ पुरंदर (दै. संध्या)



जागतिक विचारवंत आणि समाजसुधारक महात्मा जोतिराव फुले यांच्या जीवनकार्याची महती सांगणारे, सर्व सोयी-सुविधांनी युक्त असे भव्य स्मारक खानवडी येथे उभारले जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे सीईओ गजानन पाटील यांनी दिली.

खानवडी येथील जुन्या स्मारकाच्या ठिकाणी नवीन स्मारक उभारण्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अपेक्षा जाणून घेण्यात आल्या. यावेळी सीईओ पाटील यांनी ग्रामस्थांशी चर्चा केली.

या बैठकीला कार्यकारी अभियंता रामसे, उपअभियंता महेश फोंडे, शाखा अभियंता एस. व्ही. नलावडे, गटविकास अधिकारी अविनाश थोरात, कपिकेश हुली यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते. प्रस्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी वाधमारे यांनी केले.

जिल्हा परिषद सदस्य अजय इंगळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सात कोटींपेक्षा जास्त निधीची निविदा मंजूर झाली आहे. पहिल्या टप्प्यात 'महात्मा फुले वाडा' बांधण्यासाठी चार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. पुण्यातील फुलेवाड्याच्या धर्तीवरच या वाड्याची रचना असेल.

नवीन स्मारकात मुख्य प्रवेशद्वार, नियंत्रण कक्ष, चौसोपी वाडा, खोल्या आणि दालने असतील. या दालनांमध्ये महात्मा फुलेंच्या जीवनातील ऐतिहासिक प्रसंगांचे चित्ररूप दाखवले जाईल. तसेच प्रांगणात फुलेवाड्याप्रमाणे आड (विहीर), छोटे सभागृह आणि बगीचा असणार आहे.

या चर्चेत जि.प. सदस्या प्राजक्ता दुर्गाडे, हरिभाऊ लोळे, पं.स. सदस्य माणिक निंबाळकर, सुनील थिवार, चंद्रकांत फुले, महेश इंगळे, रवी फुले, दिंगाबर होले, रमेश बोरावके, अमोल बनकर, संतोष डुबलू, प्रकाश होले, सचिन होले, नितीन होले, भाऊसाहेब खोमणे यांनी सहभाग घेतला. ग्रामस्थांनी अभ्यागतांसाठी मोठे वाहनतळ, फुले दाम्पत्याचा पुतळा, दिव्यांगांसाठी रॅम्प, मुख्य स्मारकापासून शौचालय दूर ठेवावे, बांधकामात तडजोड नको आणि जुन्या वाड्याच्या मूळ दरवाजाचे जतन करावे, अशा सूचना केल्या.

ग्रामसेवक अनिल जगताप यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. दालनांच्या भिंतीवर फुलेंचा चित्रमय जीवनपट साकारला जाणार असून दुसऱ्या टप्प्यात पार्किंग आणि इतर सुविधा विकसित केल्या जातील, असे प्रशासनाने सांगितले.

फुले स्मारकाचा चेहरामोहरा बदलणार

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



वृद्धांच्या आयुष्याच्या संध्याकाळी माणुसकीची ऊब

पुणे : दैनिक संध्या

आधार समाजसेवा संस्था, विंगर परिवार आणि टाटा मोटर्सच्या सी.एस.आर उपक्रमांतर्गत समाजातील निराधार व गरजू घटकांना आधार देण्याच्या उद्देशाने निगडी प्राधिकरण येथील सुवर्ण नगरी वृद्धाश्रमात मदतकार्याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून वृद्धाश्रमाला किराणा साहित्य, वॉशिंग मशीन, डायपर, टॉवेल असे लाखो रुपयांच्या विविध जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. पुरुषोत्तम बाबर म्हणाले,"समाजसेवा ही केवळ मदत करण्यापुरती मर्यादित नसून गरजू व्यक्तीला आपण त्याच्या पाठीशी आहोत, असा विश्वास देणे ही खरी समाजसेवा आहे. वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांनी आयुष्यभर समाजासाठी आणि आपल्या कुटुंबासाठी योगदान दिले आहे. जीवनाच्या या टप्प्यावर त्यांना आधार, आपुलकी आणि सन्मान मिळणे ही समाजाची जबाबदारी आहे." यावेळी बोलताना विंगर परिवाराचे कुटुंब प्रमुख संजय वाकचौरे म्हणाले, "टाटा मोटर्स केवळ वाहने तयार करणारी संस्था नाही, तर समाजातील उपेक्षित, वंचित आणि गरजू घटकांच्या मदतीसाठी सातत्याने पुढाकार घेणारी संस्था आहे. समाजाप्रती असलेली जबाबदारी जपत अशा उपक्रमांना प्रोत्साहन देणे ही आमची सामाजिक बांधिलकी आहे." कार्यक्रमास कुटुंब प्रमुख संजय वाकचौरे, वरिष्ठ अधिकारी मनोज गाडगे, धनंजय शहाणे, सुनील कासार, संतोष गाडे, रविंद्र लामसे, अरबाज तांबोळी, श्रुतिका साळवी, अमेय सर, सुवर्ण नगरी वृद्धाश्रमाच्या संस्थापिका रश्मी झेंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपक्रम यशस्वी करण्यासाठी मोहन कोरडे, रघुनाथ फेगडे, धनंजय साळुंके, चंद्रकांत पवार, आण्णा नलवडे, अविनाश आवटे, विष्णू शिंदे आणि किशोर जैन यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संयोजन अनिल तळेकर, सतीश काळभोर, किरण बोरगे आणि पुरुषोत्तम बाबर यांनी केले. प्रास्ताविक सुनील कासार यांनी केले. सूत्रसंचालन प्रमोद मराठे यांनी केले, तर आभार प्रदर्शन महंमदशरीफ मुलाणी यांनी केले.

दिव्यांगांनी साकारलेल्या कलात्मक वस्तूंचे 'प्रोत्साहन' प्रदर्शन ९ व १० ऑक्टोबरला

पुणे : दैनिक संध्या

दिव्यांग व्यक्तींनी तयार केलेल्या कलात्मक व उपयुक्त वस्तू तसेच खाद्य पदार्थांचे 'प्रोत्साहन' प्रदर्शन कर्वे रस्त्याजवळील अश्वमेध हॉल येथे दि. ९ व १० ऑक्टोबरला आयोजित करण्यात आले आहे. सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत होणाऱ्या या प्रदर्शनास प्रवेश विनामूल्य आहे. सन २००३ पासून दिव्यांग व्यक्ती, त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था आणि सामान्य नागरिक यांच्यात परस्पर संवाद व सहकार्य निर्माण करण्याच्या उद्देशाने समविचारी मैत्रिणींच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविला जात आहे. १८ ते ८० वयोगटातील विविध प्रकारचे अपंगत्व असलेल्या व्यक्तींना त्यांनी तयार केलेल्या कलात्मक व उपयुक्त वस्तू तसेच खाद्यपदार्थ मांडून त्यांची विक्री करण्याची संधी प्रदर्शनातून मिळते. यंदा ३० दिव्यांग व्यक्ती आणि दिव्यांगांना प्रशिक्षण देणाऱ्या ८ संस्था प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. प्रदर्शनाचे उदघाटन शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता सेवासदन दिलासा कार्यशाळेच्या व्यवस्थापिका व म्युझिक थेरपिस्ट मेघना जोशी आणि विविध कलात्मक वस्तूंची निर्मिती करून उमंग क्रिएशन स्टुडिओ येथे विक्री करणाऱ्या यशस्वी उद्योजिका मूकबधीर उमा जोशी यांच्या शुभहस्ते करण्यात येईल. प्रदर्शनादरम्यान दिव्यांग कलाकार करमणुकीचे कार्यक्रम, तसेच दृष्टीहीन व्यक्ती प्रात्यक्षिक सादर करणार आहेत. नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रदर्शनास भेट देऊन दिव्यांग कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



पुणे बुक फेअरचे प्रसेनजीत फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

पुणे : दैनिक संध्या

"ज्ञानसमृद्ध समाजाची निर्मिती" या संकल्पनेवर आधारित २४व्या "पुणे बुक फेअर २०२६अर्थात "पुणे पुस्तक जत्रा" या न्यू इंग्लिश स्कूल मैदान,टिळक रोड,पुणे येथे भरलेल्या प्रदर्शनाचे उद्घाटन अधिसभा सदस्य सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रसेनजीत फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले. या वेळी .डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे, अशोक पलांडे, ,महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष श्री योगेश सोमण ,साहित्यिक श्री रवींद्र गुर्जर, सुर्यदत्तचे प्रा.संजय चोरडीया, ,पुणे बुक पेअरचे संयोजक पी .एन.आर.राजन व शिरीष चिटणीस उपस्थित होते. हा वार्षिक आणि शैक्षणिक पुस्तक मेळावा, महाराष्ट्र साहित्य परिषद,आणि लोकमंगल समूह शिक्षणस्था यांच्या सहकार्याने आयोजित केला आहे. पी.एन.आर.राजन यांनी सर्वांचे स्वागत केले व पुणे बुक फेअर विषयी माहिती दिली. फडणवीस म्हणाले "पुस्तक वाचण्याने आपण समृध्द होतो.पुणे हे जगाचे बुक कॉपिटल व्हावे अशी इच्छा व्यक्त केली. सतत २४ वर्षे पुस्तक प्रदर्शन भराविल्याबाद्दल पी एन आर राजन यांचे अभिनंदन केले." सुर्यदत्त तर्फे एकूण सहा हजार पुस्तकाचं मोफत वाटप करण्यात येणार असल्याचे डॉ संजय चोरडिया यांनी सांगितले. गुर्जर यांनी ग्रंथालयातील वाचकांची संख्या कमी होत चालली आहे या बद्दल चिंता व्यक्त केली. वाचनाची इतकी सवय लावून घ्या कि एकवेळचे जेवण घेतले नाही तरी चालेल पण त्या पैशात एक पुस्तक खरेदी करा.पुस्तक वाचण्याचा आनंद आणि समाधान वेगळेच असते. जशी जुनी चित्रपट गीते आवडतात तसी जुनी पुस्तके वाचण्याची आवड निर्माण करा. जेन झी हि पिढी पुस्तकापासून दूर जात असल्याचे सांगितले. सध्या संग्रहित माहिती गुगल सारख्या ठिकाणी तयार मिळत असते.ती परिपूर्ण नसल्याने मित्रानो भरपूर वाचन करा सोमण म्हणाले "-पुस्तक प्रदर्शन म्हणजे खूल जा सीम सीम म्हटल्यावर अलीबाबाच्या गुहेतून जसा खजिना बाहेर पडतो तसे पुस्तक प्रदर्शनाद्वारे ज्ञानाचा व माहितीचा खजिना दिसत जाईल. प्रदर्शनाची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविण्याचे आवाहन त्यांनी सर्वाना केले."

पुण्यात सीएनजीचा दर १०० रुपयांच्या पार

पुणे : दैनिक संध्या

पुणे: पुण्यात सीएनजीच्या दराने प्रतिकिलो १०० रुपयांचा टप्पा ओलांडल्याने रिक्षाचालकांच्या आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. पर्यावरणपूरक इंधन म्हणून सीएनजीचा वापर करण्यास प्रोत्साहन देताना त्याच इंधनाच्या वाढत्या दराचा संपूर्ण आर्थिक भार रिक्षाचालकांवरच का टाकला जात आहे, असा सवाल कामगार नेते व राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष नगरसेवक सुनील शिंदे यांनी केंद्र व राज्य सरकारला केला आहे. पुण्यात सध्या पेट्रोलचा दर ११२.०२ रुपये प्रतिलिटर, तर सीएनजीचा दर १००.५० रुपये प्रतिकिलो झाला आहे. पुण्यात सीएनजी वाहनांची संख्या ६.२० लाखांपेक्षा अधिक असून, रिक्षांची संख्या एक लाखांहून अधिक आहे.

श्री महालक्ष्मी मंदिरातील 'सार्वजनिक नवरात्रोत्सव' रविवारपासून

धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम ; श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबागतर्फे होणार नारीशक्तीचा सन्मान



■ पुणे (दै. संध्या)

श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबागच्या वतीने आयोजित सार्वजनिक नवरात्रोत्सव रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६ (घटस्थापना) ते मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ (दसरा) या कालावधीत साजरा होणार आहे. संपूर्ण उत्सवात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांच्या हस्ते आरती, तसेच त्यांचा सन्मान सोहळा देखील आयोजित करण्यात आला आहे. तसेच धार्मिक कार्यक्रमांसोबतच सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत, अशी माहिती मंदिर ट्रस्टच्या प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला मंदिर ट्रस्टचे प्रमुख संस्थापक आणि विश्वस्त राजकुमार अग्रवाल, ॲड. प्रताप परदेशी, उत्सव प्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल, भरत अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर आदी उपस्थित होते.

अमिता अग्रवाल म्हणाल्या, रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी (घटस्थापना) सकाळी ९ वाजता बेलराईज इंडस्ट्रीज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्रीकांत बडवे आणि सुप्रिया बडवे यांच्या हस्ते घटस्थापना होणार आहे. तसेच, सायंकाळी ६ वाजता मंदिरावरील विद्युतरोषणाईचे उद्घाटन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते होईल. 'शृंगार' या संकल्पनेवर आधारित मंदिरात आकर्षक सजावट करण्यात येणार असून मंदिराचे भव्य प्रवेशद्वार देखील या संकल्पनेवर साकारले जाणार आहे. याशिवाय दहा दिवसांत अभिषेक, याग, महाआरती असे धार्मिक कार्यक्रम देखील मंदिरामध्ये होणार आहेत. सर्व धार्मिक कार्यक्रमांचे पौरोहित्य मिलिंद राहूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली होईल.

यंदा 'शृंगार' हा संकल्पना असून याला अनुसरून घटस्थापनेच्या दिवशी श्री महालक्ष्मी देवीला नवा सोन्याचा मुकुट परिधान करण्यात येणार आहे. हा मुकुट २ किलो वजनाचा असून यामध्ये आकर्षक नक्षीकाम व कलाकुसर करण्यात आली आहे. यामुळे भक्तांना मुकुट परिधान केलेले देवीचे मनोहारी रूप पाहण्याची संधी पहिल्या दिवसापासून मिळणार आहे.

उत्सव प्रमुख डॉ.तृप्ती अग्रवाल म्हणाल्या, नवरात्राच्या दुसऱ्या दिवशी दि. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता सामूहिक महिला व पुरुष यांच्यासाठी श्रीसूक्त पठण होणार आहे. यामध्ये हजारो महिला व पुरुष देवीभक्त सहभागी होणार आहेत. महापौर मंजुषा नागपुरे यावेळी उपस्थित राहणार असून पुणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सोमवार (दि.१२) पासून दररोज सायंकाळी ५ वाजता विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला शक्तीचा सन्मान मंदिरात होणार आहे. यामध्ये अनुक्रमे अन्नदाता शक्ती : महिला शेतकरी व कृषी उद्योजिका, महिला शास्त्रज्ञ, महिला पोलीस अधिकारी, महिला वैमानिक, महिला जिल्हाधिकारी, विविध कंपन्यांमधील महिला मानव संसाधन व्यवस्थापक, नारी तू नारायणी : उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला, महिला उद्योजिकांच्या सन्मान सोहळ्याचा समावेश आहे.

मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी रात्री ८.३० वाजता अष्टलक्ष्मी भव्य मिरवणूक आयोजित करण्यात आली आहे. तसेच ललिता पंचमीला गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.३० वाजता कन्यापूजन कार्यक्रम आणि शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी गाथा शिवशंभूची हा जिवंत देखावा ही यंदाच्या उत्सवाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

याशिवाय रक्तदान व आरोग्य शिबीर, शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, ढोल-ताशा वादनसेवा, नृत्यातून देवी आराधना, बँजो वादन, माता की चौकी यासह सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी रात्री ८.३० वाजता मंदिरासमोर सामूहिक गरबा होणार आहे. धार्मिकतेला सामाजिकतेची जोड देणारा, समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारा सार्वजनिक नवरात्रोत्सव महालक्ष्मी मंदिरात दर वर्षीप्रमाणे यंदाही साजरा होणार आहे.

दसऱ्याच्या दिवशी मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी श्री महालक्ष्मी देवीला सोन्याची साडी परिधान करण्यात येणार आहे. तर रात्री ९.३० वाजता भव्य दिव्य रावणदहन कार्यक्रम देखील होणार आहे. विश्वकर्मा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी भव्य रावणाची प्रतिकृती साकारली आहे. उत्सवात महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रांतील मान्यवर मंदिरामध्ये दर्शनासाठी येणार आहेत.

भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ५ कोटी रुपयांचा विमा घेण्यात आला आहे व मंदिराच्या आजूबाजूच्या परिसरात ५० सीसीटीव्ही कॅमेरे आणि ५० हून अधिक सुरक्षारक्षक असणार आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने सर्व खबरदारी घेण्यात आली असून, पुणेकरांनी मोठ्या संख्येने उत्सवात सहभागी व्हावे, असे विश्वस्त मंडळाकडून आवाहन करण्यात आले आहे.



हर्षदा देशमुख-जाधव यांचा उमेदवारी अर्ज दाखल

■ पुणे (दै. संध्या)

पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतर्फे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) अधिकृत उमेदवार सौ. हर्षदा देशमुख-जाधव यांनी आज (६ ऑक्टोबर) पुणे विधानभवन येथे भव्य शक्तीप्रदर्शनात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. पदवीधरांच्या प्रश्नांवर केवळ आश्वासने न देता, ठोस कृतीचा अजेंडा घेऊन निवडणूक रिंगणात उतरल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

उमेदवारी अर्ज दाखल करताना महाविकास आघाडीतील विविध घटकांमधील प्रमुख नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, ज्येष्ठ नेते जयंत पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मोहन जोशी, आमदार सतेज (बंटी) पाटील, आमदार विश्वजीत कदम, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी महापौर अंकुश काकडे, माजी सनदी अधिकारी प्रभाकर देशमुख, काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, शिवसेना ठाकरे गटाचे शहराध्यक्ष वसंत मोरे, तसेच के. जे. इन्स्टिट्यूटचे संस्थापक कल्याण जाधव यांच्यासह महाविकास आघाडीचे विविध नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांच्या हस्ते संकल्पनामा प्रकाशित करण्यात आला.

अर्ज दाखल केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना हर्षदा देशमुख-जाधव म्हणाल्या, "पदवी ही केवळ कागदी प्रमाणपत्रापुरती मर्यादित राहू नये. त्यातून रोजगार, नवीन कौशल्ये आणि संधींची नवी दिशा निर्माण झाली पाहिजे.

हर्षदा देशमुख-जाधव यांनी 'ड्रीम सोशल फाउंडेशन'च्या माध्यमातून शिक्षण, महिला सक्षमीकरण, 'स्मार्ट गर्ल' उपक्रम, आरोग्य आणि पर्यावरण (वृक्ष माझा सखा) या क्षेत्रांत तळागाळात काम केले आहे. तसेच, ट्रिनिटी शिक्षण संस्था आणि रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्य म्हणून प्रदीर्घ अनुभवाचा उपयोग शिक्षण आणि उद्योगांमधील अंतर कमी करण्यासाठी, तसेच युवकांना बदलत्या बाजारपेठेनुसार रोजगाराभिमुख बनवण्यासाठी करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिक्षकांचा आमदार शिक्षकच पाहिजे : प्राचार्य नंदकुमार सागर

■ पुणे (दै. संध्या)



पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्राचार्य नंदकुमार सागर यांचा उमेदवारी अर्ज वैध ठरला असून, शिक्षकांचे प्रश्न, शैक्षणिक क्षेत्रातील अडचणी आणि शिक्षकांच्या हक्कांसाठी सातत्याने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्राचार्य नंदकुमार सागर यांनी पुणे विभागातील विविध शाळांना भेटी देऊन शिक्षक बांधव-भगिनींशी संवाद साधण्यास सुरुवात केली आहे. या भेटींमध्ये शिक्षकांकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद, विश्वास आणि पाठिंबा हीच आपल्या कार्याची खरी ताकद असल्याचे त्यांनी सांगितले. "शिक्षकांचे प्रश्न शिक्षकांच्या प्रतिनिधीनेच प्रभावीपणे मांडले पाहिजेत," या भूमिकेतून आपण ही निवडणूक लढवत असल्याचे सागर यांनी स्पष्ट केले. शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांना शासन दरबारी योग्य व्यासपीठ मिळवून देणे, शैक्षणिक क्षेत्रातील अडचणी मांडणे आणि शिक्षकांच्या हक्कांसाठी सातत्याने आवाज उठविणे हा आपल्या उमेदवारीमागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षक मतदारांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या समस्या आणि अपेक्षा जाणून घेण्यावर सागर यांनी भर दिला आहे. शिक्षकांचा विश्वास, संवाद आणि सहभाग हीच लोकशाही प्रक्रियेची खरी ताकद असून, शिक्षकांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारे नेतृत्व निवडण्यासाठी प्रत्येक शिक्षक मतदाराने विचारपूर्वक निर्णय घ्यावा.

मिन्त्राचा बिग फॅशन फेस्टिव्हल ८ ऑक्टोबरपासून

■ पुणे (दै. संध्या)

सणासुदीच्या खरेदी हंगामाची सुरुवात करत, मिन्त्राने आपल्या प्रमुख बिग फॅशन फेस्टिव्हलची घोषणा केली असून तो आता लाइव्ह झाला आहे. या फेस्टिव्हलमध्ये ग्राहकांसाठी हजारो ब्रँड्स आणि लाखो स्टाइल्स उपलब्ध आहेत. भारताच्या फॅशन आणि लाइफस्टाइल इकोसिस्टमला चालना देणारा घटक म्हणून मिन्त्राची भूमिका या उपक्रमामुळे अधिक मजबूत होणार आहे. यामुळे उदयोन्मुख ब्रँड्ससाठी मोठ्या प्रमाणात संधी निर्माण होतील, तसेच देशभरातील लाखो ग्राहकांना ट्रेंड-फर्स्ट निवड, आकर्षक ऑफर्स आणि अधिक सोयीस्कर खरेदीचा अनुभव मिळेल.

प्रीमियम आणि व्हॅल्यू-आधारित उत्पादनांची विस्तृत श्रेणी, ट्रेंड-आधारित स्टाइल्स, टेक्नॉलजी-आधारित वैयक्तिकृत शॉपिंग अनुभव तसेच एम-नाऊ आणि एम-एक्सप्रेस द्वारे अधिक वेगवान डिलिव्हरी यांच्या जोरावर BFF दरम्यान महानगरांसह बिगर-महानगरांमधूनही वाढीव मागणी अपेक्षित आहे.

बिग फॅशन फेस्टिव्हलबाबत बोलताना मिन्त्राच्या प्रमुख शेरॉन पैस म्हणाल्या, "बिग फॅशन फेस्टिव्हल हा भारताच्या उत्सवी कॅलेंडरमधील एक महत्त्वपूर्ण टप्पा बनला आहे. प्रादेशिक विक्रेते आणि लघुउद्योगांना सक्षम करण्यापासून ते जागतिक आणि भारतीय फॅशन व लाइफस्टाइल ब्रँड्समधील सर्वोत्तम उत्पादने लाखो घरांपर्यंत पोहोचवण्यापर्यंत, तो आमच्या संपूर्ण इकोसिस्टमला जोडतो.

मिन्त्रामध्ये आम्ही या उत्सवी वातावरणाला अत्याधुनिक टेक्नॉलजीची जोड देत आहोत.

आमची एआय साधने आणि विस्तारित डिलिव्हरी नेटवर्क यांच्या मदतीने देशभरातील 80 दशलक्षांहून अधिक ग्राहकांसाठी फॅशन अधिक सुलभ, वैयक्तिकृत आणि अखंड बनवत आहोत."

गीता मालुसरेची ऐतिहासिक कामगिरी, ९६ दिवसांत तीन खाड्या पार

■ पुणे (दै. संध्या)

पुण्याची ओपन वॉटर जलतरणपटू गीता महेश मालुसरे हिने अवघ्या ९६ दिवसांत इंग्लिश चॅनेल, कॅटालिना चॅनेल आणि न्यूयॉर्कमधील २० ब्रिजेस स्विम पूर्ण करून 'ओपन वॉटर स्विमिंग ट्रिपल क्राउन' पटकावला आहे. अशी कामगिरी करणारी ती पहिली भारतीय जलतरणपटू ठरली आहे.

गीता हिने जगातील सात प्रमुख खाड्या पोहून 'क्वीन ऑफ ओशन' हा बहुमान मिळविण्याचे ध्येय ठेवले आहे. या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करताना तिने सर्वप्रथम इंग्लिश चॅनेलची कठीण परीक्षा पूर्ण केली. त्यानंतर अमेरिकेतील प्रसिद्ध कॅटालिना चॅनेल तिने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत १५ तास ४२ मिनिटांत पोहून पार केला. कॅटालिना चॅनेल पूर्ण करणारी ती भारतातील पाचवी महिला ठरली होती. यानंतर न्यूयॉर्कमधील मॅनहॅटन बेटाभोवतीची २० ब्रिजेस स्विम तिने नुकतीच पूर्ण केली. सुमारे ४६ किलोमीटरचे अंतर ९ तास ३२ मिनिटांत पार करीत तिने ही कामगिरी केली. त्यामुळे इंग्लिश चॅनेल, कॅटालिना चॅनेल आणि २० ब्रिजेस स्विम या तीन आव्हानात्मक जलतरण मोहिमा पूर्ण करून तिने ओपन वॉटर स्विमिंग ट्रिपल क्राउन मिळविला. अवघ्या ९६ दिवसांत तीन खडतर जलतरण मोहिमा पूर्ण करण्याचा गीता मालुसरे यांचा पराक्रम कमी दिवसात ट्रिपल क्राऊन मिळवणारी गीता जगातील सहावी महिला, आशियातील दुसरी तर भारतातील पहिली महिला ठरली आहे. भारतीय ओपन वॉटर जलतरण क्षेत्रातील ऐतिहासिक कामगिरी मानली जात आहे. 'क्वीन ऑफ ओशन'हे ध्येय पूर्ण करण्याच्या तिच्या प्रवासातील ही महत्त्वाची आणि प्रेरणादायी पायरी ठरली आहे. हा संपूर्ण



प्रवास अविस्मरणीय ठरल्याचे गीतांनी सांगितले. "ही स्विम माझ्या हृदयात कायम विशेष स्थान ठेवेल," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. गीता यांच्या या प्रवासाची सुरुवात इंग्लिश चॅनेलपासून झाली. जेलीफिशच्या दंशामुळे आलेल्या मोठ्या अडथळ्यानंतर त्यांनी पुन्हा नव्या जोमाने जलतरणाच्या आव्हानांना सामोरे जाण्यास सुरुवात केली. प्रत्येक स्विमने आपल्याला नवा धडा दिला आणि मानसिकदृष्ट्या अधिक मजबूत केले, असे त्यांनी म्हटले आहे. कॅटालिना चॅनेल स्वीमिंग दरम्यान दोन्ही हातांना झालेल्या दुखापती हे मोठे आव्हान होते. मात्र, या टप्प्यावर पोहोचण्यासाठी केलेले कठोर परिश्रम, वेदना, त्याग आणि जिद्द लक्षात घेता माघार घेण्याचा प्रश्नच नव्हता, असे गीतांनी नमूद केले. या यशामागे कुटुंबीयांचा मोठा वाटा असल्याचेही त्यांनी सांगितले. वडील, आई, आजी आणि संपूर्ण कुटुंबाने केलेले त्याग व दिलेला पाठिंबा याबद्दल गीतांनी कृतज्ञता व्यक्त केली. सराव आणि तयारीच्या काळात साथ दिल्याबद्दल कोच प्रतीक जावडेकर यांचे, तसेच सातत्याने पाठिंबा दिल्याबद्दल शेखर खासनीस यांचे त्यांनी आभार मानले. 20 Bridges Swim साठी स्पॉन्सरशिप केल्याबद्दल Venkys तसेच क्रांती रिअल्टर्स यांचेही त्यांनी विशेष आभार मानले. याशिवाय अमेरिकेत प्रत्यक्ष मदत करणारे प्रीती सावंत जाधव, सुदीप जाधव, राजवीर जाधव आणि कौस्तुभ हळबे, वैष्णवी कुडले यांनी या संपूर्ण स्विमदरम्यान दिलेल्या पाठिंब्याबद्दल गीतांनी कृतज्ञता व्यक्त केली. "हे यश केवळ माझे नाही. माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या अनेकांचे प्रेम, त्याग, प्रोत्साहन आणि पाठिंबा यामुळे हा प्रवास शक्य झाला," असे गीतांनी आपल्या फेसबुक पोस्टमध्ये म्हटले आहे. "तीन स्विम्स, तीन धडे, एक अविस्मरणीय प्रवास. ९६ दिवस, एक स्वप्न आणि एक Open Water Swimming Triple Crown," या शब्दांत गीतांनी आपल्या ऐतिहासिक कामगिरीचा आनंद व्यक्त केला

थोडक्यात पण महत्वाचे

एचवायबीईकडून 'वीवर्स कॉन फेस्टिव्हल इंडिया'ची घोषणा



पुणे : दैनिक संध्या

एचवायबीई आपला प्रमुख जागतिक संगीत महोत्सव वीवर्स कॉन फेस्टिव्हल प्रथमच भारतात घेऊन येत आहे. 27-28 मार्च 2027 रोजी नवी दिल्ली येथे हा महोत्सव आयोजित करण्यात येणार असून, कोरियाबाहेर प्रथमच या महोत्सवाचे आयोजन भारतात होणार आहे. दोन दिवस चालणारा वीवर्स कॉन फेस्टिव्हल इंडिया एचवायबीई चा खास थेट संगीताचा अनुभव भारतात घेऊन येणार आहे. या महोत्सवात भारतातील तसेच जगभरातील नामांकित कलाकार, नेत्रदीपक संगीत सादरीकरणे आणि चाहत्यांच्या संस्कृतीचा उत्साहपूर्ण जल्लोष एकाच मंचावर पाहायला मिळणार आहे. भारतीय चाहत्यांसाठी हा महोत्सव एक महत्त्वाचा आणि ऐतिहासिक क्षण ठरणार असून, भारतीय चाहत्यांसाठी, हा महोत्सव देशातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या के-पॉप महोत्सवांपैकी एक असेल. जागतिक सुपरफॅन प्लॅटफॉर्म वीवर्सच्या माध्यमातून विकसित झालेल्या इमर्सिव्ह फॅन अनुभवातून प्रेरणा घेत, हा महोत्सव केवळ लाईव्ह परफॉर्मन्सपुरता मर्यादित राहणार नाही. एका प्रत्यक्ष ठिकाणी संगीत, चाहत्यांचा परस्परसंवादी सहभाग, ब्रँड ॲक्टिव्हेशन्स आणि सांस्कृतिक अनुभव यांचा अनोखा संगम या महोत्सवात पाहायला मिळणार आहे. कलाकार आणि त्यांच्या चाहतावर्गातील नातेसंबंधावर आधारित या महोत्सवात चाहत्यांना संपूर्ण अनुभवादरम्यान कलाकार तसेच इतर चाहत्यांशी संवाद साधण्याच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. वीवर्स कॉन फेस्टिव्हल इंडिया मध्ये भारतीय तसेच के-पॉप कलाकारांचा वैविध्यपूर्ण सहभाग असणार आहे. यासोबतच कलाकार आणि विविध संस्कृतींना नव्या पद्धतीने एकत्र आणणारे विशेष सहयोगी मंच हे या महोत्सवाचे खास आकर्षण ठरणार आहेत.

एका दिवसात २०१ ई-पुस्तकांच्या प्रकाशनाचा विश्वविक्रम

अकोला: दैनिक संध्या

एकाच दिवसात तब्बल २०१ स्वतंत्र ई-पुस्तके प्रकाशित करून प्रत्येक पुस्तकाला स्वतंत्र आयएसबीएन क्रमांक मिळविण्याचा विश्वविक्रम अकोल्यातील डॉ. वैभवकुमार भगवानराव शिंदे यांनी नोंदविला आहे. १० जुलै २०२६ रोजी झालेल्या या डिजिटल प्रकाशनाची 'लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स' आणि 'बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स' या संस्थानी दखल घेत प्रमाणपत्र बहाल केले आहे. मूळचे बीड जिल्ह्यातील माजलगाव येथील असलेले डॉ. शिंदे हे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या अक्षय ऊर्जा अभियांत्रिकी विभागात सहायक प्राध्यापक आहेत. लेखक, संशोधक आणि संगीतकार म्हणूनही त्यांची ओळख आहे. या २०१ पुस्तकांमध्ये ३० चरित्रग्रंथ, १३ काव्यसंग्रह, ३५ अभियांत्रिकी व ६६ तंत्रज्ञानविषयक पुस्तके, ५७ विचारसंग्रह आणि ६६ पुस्तकांच्या सारांशांचा समावेश आहे. ही पुस्तके मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा तीन भाषांमध्ये असून, ती जगभरातील ५० हून अधिक डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. एकाच दिवसात २०१ पुस्तके प्रकाशित झाली असली तरी त्यामागे तब्बल दहा वर्षांचा लेखन, संशोधन, संपादन, अनुवाद, मुद्रितशोधन आणि प्रकाशनपूर्व तयारीचा प्रवास आहे. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विषयक पुस्तकांसाठी त्यांनी विद्यार्थी दशेपासून जतन केलेल्या अभ्याससाहित्याचे पुनर्लेखन करून त्याचे पुस्तकांमध्ये रूपांतर केले. "हा विक्रम एका दिवसाचे फलित नसून जवळपास दशकभराच्या कामाचा परिपाक आहे. १० जुलै हा २०१ पुस्तकांच्या एकत्रित प्रकाशनाचा दिवस होता; मात्र त्यामागील लेखन, संशोधन, अनुवाद, संपादन व तयारी अनेक वर्षे सुरू होती."

अरुंधती फाउंडेशनतर्फे सामूहिक तर्पण कार्यक्रमाचे १० ऑक्टोबरला आयोजन

पुणे : दैनिक संध्या

सर्वपित्री अमावस्येनिमित्त आपल्या पूर्वजांच्या स्मृतींना तसेच धर्मरक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या वीरांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यासाठी अरुंधती फाउंडेशन, पुणे आणि श्री देवदेवेश्वर संस्थान, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सामूहिक तर्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती अरुंधती फाउंडेशनचे अध्यक्ष हिमांशु गुप्ते यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संस्थेचे आदित्य गुप्ते उपस्थित होते. शनिवार, १० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सदाशिव पेठेतील एस. पी. कॉलेज कॅम्पस येथील लेडी रमाबाई हॉल येथे हा कार्यक्रम होणार आहे. सर्वपित्री अमावस्येच्या पवित्र दिवशी पूर्वजांच्या स्मृतींना अभिवादन करण्याबरोबरच देश, धर्म आणि मातृभूमीसाठी बलिदान देणाऱ्या असंख्य वीरांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सदानंद गोविंद फडके राहणार असून प्रमुख निमंत्रित म्हणून स्वाती गोयल शर्मा उपस्थित राहणार आहेत. यावेळी 'जेम्स ऑफ बॉलिवूड' या विषयावर स्वाती गोयल शर्मा यांचे विशेष ऑडिओ-व्हिज्युअल सादरीकरणही होणार आहे. रमेश भागवत, विश्वस्त, श्री देवदेवेश्वर संस्थान, पुणे हे सहकार्य करणार आहेत. अरुंधती फाउंडेशनचे आयोजक हिमांशू गुप्ते आणि आदित्य गुप्ते यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. कार्यक्रमाला कर्णाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे, अरुंधती फाउंडेशन आणि कै. श्रीकांत लिंगायत मेमोरियल ट्रस्ट, पुणे यांचे सहकार्य लाभले आहे.

विवोकडून भारतात एक्स फोल्ड६ लाँच

नवी दिल्ली : दैनिक संध्या

विवो इंडियाने आज आपला नवीनतम फोल्डेबल स्मार्टफोन, विवो एक्स फोल्ड६ लाँच केला, जो फ्लॅगशिप स्मार्टफोनच्या अनुभवाला मल्टीटास्किंगसाठी तयार केलेल्या एका शक्तिशाली उत्पादकता वर्कस्पेसमध्ये रूपांतरित करतो. ओरिजिनओएस ७, प्रगत एआय टूल्स, फ्लॅगशिप झाईस इमेजिंग आणि ६९००mAh क्षमतेची मोठी बॅटरी यांसारख्या वैशिष्ट्यांसह, एक्स फोल्ड६ अशा व्यावसायिकांसाठी फ्लॅगशिप फोटोग्राफी आणि एक शक्तिशाली उत्पादकता अनुभव घेऊन येतो, ज्यांना प्रवासात असताना काम करायचे आहे, नवनिर्मिती करायची आहे आणि कनेक्टेड राहायचे आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors /agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works,

Tender No. EE/400kV/Chakan/Tech/2026-27/ET-13 **(RFX No.7000041766) Work:-** E-tender for Biennial rate contract for work of servicing and overhauling of 22/33kV VCBs with replacement of worn out parts for Two Years at 400kV Chakan Substation **Tender Amount:-** Rs. 10,00,000.00 (Including taxes) & Rs. 8,47,457.00 (Excluding GST). **EMD:-** Rs. 84745.00 **Tender Fees:-** Rs. 590/- (Rs. 500 + 18% GST) **Download of tender documents Date:-** From 09.10.2026 from 10.00 Hrs. to 19.10.2026 up to 10:00 Hrs. **Bid Opening:-** dtd 19.10.2026, 11:00 Hrs. (Tech. Bid), dtd 20.10.2026, 11:00 Hrs. (Price Bid). For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in** & open above RFX for downloading tender document, schedules & annexures.

Sd/-
Executive Engineer
400kV RS O&M Division, MSETCL, Chakan

'कला कृषी बाजार'चा पुण्यात समारोप

- 20 हून अधिक राज्यांतील 150 हून अधिक संस्था आणि 3,000 हून अधिक उत्पादनांचे प्रदर्शन.
- कृषीभूषण विजय अण्णा बोराडे यांना कृषी, शेतकरी सक्षमीकरण आणि ग्रामीण विकासातील योगदानाबद्दल 'अतुल्य योगदान पुरस्कार 2026' प्रदान



■ पुणे (दै. संध्या)

इशान्या फाउंडेशनतर्फे NABARDच्या भारत ग्राम उत्सवाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या 19व्या 'कला कृषी बाजार' या उपक्रमाचा पुण्यात उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. भारतभरातील कारागीर, शेतकरी, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक उद्योजकांना एकत्र आणणाऱ्या या पाच दिवसीय उपक्रमात 20 हून अधिक राज्यांतील 150 हून अधिक सहभागी संस्था आणि 3,000 हून अधिक उत्पादने सहभागी झाली. पारंपरिक हस्तकला, हातमाग, कृषी उत्पादने, शाश्वत उत्पादने आणि विविध प्रादेशिक खाद्यपदार्थ अनुभवण्याची तसेच त्यामागील समुदायांशी थेट संवाद साधण्याची संधी यामुळे पुणेकरांना मिळाली. समारोप सोहळ्यातील प्रमुख आकर्षण म्हणजे 'अतुल्य योगदान पुरस्कार 2026'प्रदान करण्यात आले. कृषी, ग्रामीण विकास आणि समुदाय सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा या पुरस्काराद्वारे गौरव करण्यात आला.

'कृषीभूषण' म्हणून परिचित असलेले विजय अण्णा बोराडे यांना मराठवाड्यातील पावसावर आधारित शेती, जलसंधारण आणि दुष्काळप्रवण भागांसाठी उपयुक्त शेती पद्धतींमध्ये दिलेल्या योगदानाबद्दल गौरविण्यात आले. मराठवाडा शेती सहाय्य मंडळाचे कार्यकारी संचालक म्हणून त्यांनी कृषी शिक्षण, जलव्यवस्थापन आणि ग्रामीण समुदायांना सक्षम करणाऱ्या तळागाळातील विविध उपक्रमांवर सातत्याने काम केले आहे. तसेच शाश्वत कृषी पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

यावेळी दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड (DFPCL) चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. सैलेश मेहता म्हणाले, "यावर्षीचे अतुल्य योगदान पुरस्कार प्राप्त मानकरी तळागाळातील नवोन्मेषाच्या माध्यमातून ग्रामीण उपजीविकेत परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता अधोरेखित करतात. जलसंधारण, हवामानाच्या आव्हानांना तोंड देणारी शेती आणि शेतकरी उद्योजकतेच्या विकासासाठी त्यांचे कार्य ठोस आणि दीर्घकालीन परिणाम घडवत आहे. इशान्या फाउंडेशन आणि कला कृषी बाजाराला या प्रयत्नांचा गौरव करताना तसेच स्थानिक पातळीवर सुरू असलेल्या परिवर्तनाच्या प्रेरणादायी कथा व्यापक स्तरावर पोहोचवताना अभिमान वाटतो."

इशान्या फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती पारुल मेहता म्हणाल्या, "यावर्षीच्या कला कृषी बाजाराच्या माध्यमातून इशान्या फाउंडेशनने अर्थपूर्ण प्रगती घडवून आणणाऱ्या कल्पना आणि उपक्रमांना ओळख देण्याची आणि त्यांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची आपली बांधिलकी अधोरेखित केली आहे. नवोन्मेष, उद्योजकता आणि शाश्वत विकासाला चालना देणाऱ्या व्यक्तींच्या प्रयत्नांचा गौरव करून हे व्यासपीठ केवळ त्यांच्या यशाचा सन्मान करत नाही, तर अधिक सक्षम ग्रामीण अर्थव्यवस्था उभारण्यासाठी व्यापक सहभागालाही प्रेरणा देते." उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तीन सर्वोत्कृष्ट स्वयंसेवी संस्थांना (NGOs) रोख पारितोषिके देऊन त्यांच्या कार्याबद्दल कौतुक आणि प्रोत्साहन व्यक्त करण्यात आले. या आर्थिक सहाय्यामुळे संबंधित संस्थांना आपल्या उत्पादनांमध्ये अधिक सुधारणा करणे, विपणन उपक्रम बळकट करणे, विकासासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध करणे आणि संस्थात्मक क्षमता वाढविणे शक्य होईल. परिणामी, त्यांना आपला सामाजिक प्रभाव अधिक व्यापक करण्यास आणि पुढील टप्प्यावर प्रगती करण्यास मदत मिळेल.

महाराष्ट्रात युनायटेड ब्रुअरीजच्या मूल्यसाखळीतून ₹५,९०० कोटींची मूल्यवृद्धी; ३६,९०० रोजगारांना आधार

■ मुंबई : (दै. संध्या)

HEINEKEN समूहाचा भाग असलेल्या युनायटेड ब्रुअरीज लिमिटेडच्या महाराष्ट्रातील व्यवसायामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठे योगदान मिळत असल्याचे स्वतंत्र सामाजिक-आर्थिक परिणाम मूल्यांकनातून समोर आले आहे. Steward Redqueen या संस्थेने केलेल्या अभ्यासानुसार, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये कंपनीच्या संपूर्ण मूल्यसाखळीमुळे महाराष्ट्रात अंदाजे ₹५,९०० कोटींची मूल्यवृद्धी झाली असून, सुमारे ३६,९०० रोजगाराच्या संधींना आधार मिळाला आहे.

अभ्यासानुसार, युनायटेड ब्रुअरीजच्या उत्पादनांची महाराष्ट्रात आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये सुमारे २.३ कोटी पेट्यांची विक्री झाली. कंपनीच्या थेट व्यवसायाबरोबरच स्थानिक पुरवठादार, वाहतूक, वितरण, किरकोळ विक्री आणि उपाहारगृह क्षेत्रालाही या व्यवसायाचा लाभ होत असल्याचे मूल्यांकनात नमूद करण्यात आले आहे. अभ्यासानुसार, युनायटेड ब्रुअरीजच्या मूल्यसाखळीमुळे महाराष्ट्राच्या राज्य सकल देशांतर्गत उत्पादनात सुमारे ०.१ टक्के योगदानाच्या प्रमाणात ₹५,९०० कोटींची मूल्यवृद्धी झाली. महाराष्ट्रात युनायटेड ब्रुअरीजमध्ये थेट १,३०७ कर्मचारी कार्यरत आहेत. त्याशिवाय पुरवठादार व संबंधित व्यवसायांमधून सुमारे ९,७०० अपस्ट्रीम रोजगार, तर वितरण, विक्री केंद्रे आणि संबंधित पुरवठादारांमधून सुमारे २५,९०० डाउनस्ट्रीम रोजगारांना आधार मिळतो.

अभ्यासानुसार, कंपनीत थेट कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तीमागे महाराष्ट्राच्या व्यापक अर्थव्यवस्थेत आणखी २७ रोजगाराच्या संधींना आधार मिळतो. त्यापैकी सात रोजगार पुरवठा साखळीच्या माध्यमातून, तर २० रोजगार वितरण आणि विक्रीच्या माध्यमातून निर्माण होतात. महाराष्ट्रातील स्थानिक पुरवठादारांकडून आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये कंपनीने अंदाजे ₹१,४०० कोटींच्या वस्तू आणि सेवांची खरेदी केली. ही कंपनीच्या एकूण देशांतर्गत खरेदीच्या सुमारे २० टक्के आहे. काचेच्या बाटल्या, डबे, मद्यनिर्मितीसाठी लागणारी पिके, वाहतूक, व्यापार, रसायने, लेबल, व्यावसायिक सेवा, बांधकाम, यंत्रसामग्री यांसह विविध वस्तू आणि सेवांचा या खरेदीमध्ये समावेश आहे. त्यामुळे स्थानिक उद्योग आणि व्यवसायांना चालना मिळत असल्याचे अभ्यासातून स्पष्ट होते. युनायटेड ब्रुअरीजच्या संपूर्ण मूल्यसाखळीमुळे महाराष्ट्रात अंदाजे ₹४,२०० कोटींच्या कर भरण्याला आधार मिळाल्याचे मूल्यांकनात नमूद करण्यात आले आहे. ग्राहक युनायटेड ब्रुअरीजच्या उत्पादनांवर खर्च करत असलेल्या प्रत्येक ₹१ पैकी सुमारे ६३ पैसे करांच्या माध्यमातून राज्य सरकारकडे जात असल्याचा अभ्यासाचा अंदाज आहे. कंपनीच्या माध्यमातून समर्थित कर योगदान महाराष्ट्राच्या एकूण राज्य कर महसुलाच्या सुमारे १.२ टक्के असल्याचेही अहवालात नमूद आहे. कंपनीच्या आर्थिक योगदानाबरोबरच पर्यावरण संवर्धन आणि समुदाय विकासावरही भर दिला जात असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

पुण्यात प्रथमच 'ट्रायोरा'चा अनोखा संगम; तीन दिग्गज ब्रँड्सची भव्य फॅशन पर्वणी

■ पुणे : (दै. संध्या)

पुण्याच्या फॅशन, विवाह आणि उत्सवी विश्वात प्रथमच तीन प्रतिष्ठित ब्रँड्स एका व्यासपीठावर येत असून, 'ट्रायोरा – व्हेन थ्री लेगसीज मीट' या दोन दिवसीय भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राया एथनिक, पल्लोड आणि राठोड ज्वेलर्स हे तीन नामांकित ब्रँड्स प्रथमच एकत्र येत असून, ११ आणि १२ ऑक्टोबर रोजी शेरेटन ग्रँड, पुणे येथे हा विशेष सोहळा रंगणार आहे. पुण्यातील सण-समारंभ आणि विवाहसोहळ्यांच्या फॅशनमध्ये आपापल्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केलेल्या या तिन्ही ब्रँड्सच्या कलाकुसरीचा आणि परंपरेचा अनोखा संगम 'ट्रायोरा'मध्ये पाहायला मिळणार आहे. राया एथनिकतर्फे आकर्षक फेस्टिव्ह आणि वेडिंग मेन्सवेअर, पल्लोडतर्फे ब्रायडल आणि फेस्टिव्ह वुमन्सवेअर, तर राठोड ज्वेलर्सतर्फे काळाच्या कसोटीवर उतरलेले दागिन्यांचे कलेक्शन सादर केले जाणार आहे. या दोन दिवसांत विविध आकर्षक रॅम्प वॉकच्या माध्यमातून यंदाच्या फेस्टिव्ह आणि ब्रायडल कलेक्शनचे सादरीकरण केले जाणार आहे. त्याचबरोबर फॅशन आणि स्टायलिंग क्षेत्रातील तज्ज्ञांकडून वन-ऑन-वन स्टायलिंग सेशन्सचे आयोजन करण्यात आले असून, लग्नसमारंभापासून विविध उत्सवी प्रसंगांसाठी योग्य पेहराव आणि दागिन्यांची निवड करण्याबाबत मार्गदर्शन मिळणार आहे. 'ट्रायोरा'चे वैशिष्ट्य केवळ खरेदीपुरते मर्यादित नसून, अभ्यागतांना फॅशन, कारागिरी आणि वारशाचा प्रत्यक्ष अनुभव देणारे हे एक इमर्सिव्ह सेलिब्रेशन असणार आहे. पोशाखातील पहिल्या धाग्यापासून ते दागिन्यांच्या अंतिम कलाकुसरीपर्यंत प्रत्येक बारकावा अनुभवता यावा, यासाठी विशेष स्वरूपाची मांडणी करण्यात आली आहे.

पुण्यातील आगामी लग्नसराई आणि उत्सवी हंगामाच्या पार्श्वभूमीवर 'ट्रायोरा' हा फॅशनप्रेमी, नववधू-वर आणि कुटुंबांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. तीन पिढ्यांपासून विश्वास संपादन केलेल्या या तीन ब्रँड्सचा एकाच छताखाली प्रथमच होणारा संगम ही पुण्याच्या फॅशनविश्वातील उल्लेखनीय घटना ठरणार आहे. हा सोहळा सर्वांसाठी खुला असून, फॅशन, परंपरा, दागिन्यांची कलाकुसर आणि उत्सवी जल्लोषाचा अनोखा अनुभव पुणेकरांना या निमित्ताने घेता येणार आहे.

कोटक सिक्युरिटीजने आपल्या रिटेल व्यवसायाचे नाव बदलून केले 'कोटक निओ'

■ मुंबई : (दै. संध्या)

- गुंतवणूक, ट्रेडिंग आणि वेल्थ सोल्यूशन्स आणले एकाच छताखाली
- भारतीयांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी डिजिटल आणि रिलेशनशिप-आधारित सुविधांचे एकत्रीकरण

कोटक सिक्युरिटीज लिमिटेडने आज आपल्या ग्राहकांसाठीच्या ब्रँड ओळखीचे नाव बदलून 'कोटक निओ' करत असल्याचे जाहीर केले. याद्वारे एक एकीकृत आणि भविष्यासाठी सज्ज असलेली गुंतवणूक व्यवस्था तयार करण्यात आली आहे. आजच्या काळात ग्राहक ज्या प्रकारे आर्थिक बाजारात सहभागी होतात, त्या पद्धतीत झालेला मूलभूत बदल 'कोटक निओ' मधून दिसून येतो. आजच्या ग्राहकांना अधिक पर्याय, विनाअडथळा डिजिटल अनुभव आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन एकाच ठिकाणी हवे आहे. भारतातील गुंतवणूकदार आणि ट्रेडर्सच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी कोटक सिक्युरिटीजने नवीन तंत्रज्ञान, उत्पादन नवकल्पना, संशोधन आणि ग्राहक अनुभवामध्ये केलेल्या मोठ्या गुंतवणुकीनंतर हा बदल करण्यात आला आहे. या निर्णयामुळे डिजिटल क्षमता, संशोधन क्षेत्रातील प्राविण्य आणि रिलेशनशिप-आधारित सुविधा एकत्र येऊन हा संपूर्ण व्यवसाय एकाच ब्रँड ओळखीखाली आला आहे. या लाँच प्रसंगी बोलताना कोटक निओचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीपाल शाह म्हणाले, "गुंतवणूकदारांच्या गरजा सतत बदलत आहेत. आज ते फक्त शेअर्स, म्युच्युअल फंड किंवा डेरिव्हेटिव्ह्ज यांसारख्या वैयक्तिक उत्पादनांचा विचार करत नाहीत, तर संपत्ती कशी निर्माण करायची, पोर्टफोलिओमध्ये विविधता कशी आणायची आणि अर्थव्यवस्थेतील विविध संधींमध्ये कसे सहभागी व्हायचे, या संपूर्ण चित्राचा विचार करत आहेत. परंतु या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक प्लॅटफॉर्म्स, पुरवठादार आणि सल्लागारांशी संपर्क साधावा लागतो. 'कोटक निओ'च्या माध्यमातून हा सर्व प्रवास एकाच इकोसिस्टममध्ये एकत्र आणणे हे आमचे उद्दिष्ट आहे."

या दिवाळीत, कॅलिफोर्निया बदामांची इच्छा आहे की तुम्ही तुमच्या प्रत्येक 'बडी'ला बदाम भेट द्या

■ मुंबई : (दै. संध्या)



या दिवाळीत, कॅलिफोर्निया बदाम आपली नवीन सणासुदीची मोहीम 'प्रत्येक बडीसाठी बदाम' लाँच करत असून, ग्राहकांना त्यांच्या दिवाळीच्या भेटवस्तूंच्या यादीचा नव्याने विचार करण्याचे एक कारण देत आहे. एका उत्साही म्युझिकल फिल्मद्वारे सादर करण्यात आलेली ही मोहीम तरुण ग्राहकांना त्यांच्या नेहमीच्या कौटुंबिक यादीच्या पलीकडे पाहण्याचे आणि त्यांच्या आयुष्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अनेक मित्रांनाही बदाम भेट देण्याचे आवाहन करते—वर्क बडींपासून जिम बडींपर्यंत, ट्रॅव्हल बडींपासून कॉफी बडींपर्यंत आणि त्याही पुढे.

दिवाळी हा भारतातील भेटवस्तू देण्याच्या सर्वात मोठ्या प्रसंगांपैकी एक आहे. त्याच वेळी, लोक भेटवस्तू कशा देतात आणि कोणाला देतात, यामध्येही बदल होत आहे. नव्या पिढीसाठी, पहिली नोकरी सुरू करणे, नवीन शहरांमध्ये राहणे आणि आपले असे मित्रांचे वर्तुळ तयार करणे, जे आता निवडलेले कुटुंब बनले आहेत, यामुळे सणासुदीच्या भेटवस्तूंची यादी आता नातेवाईक आणि औपचारिक संबंधांच्या पलीकडेही विस्तारली आहे. 'प्रत्येक बडीसाठी बदाम' ही मोहीम बदाम भेट देण्याच्या परंपरेला आणखी एक पाऊल पुढे घेऊन जाते.

ही म्युझिकल फिल्म विविध रंगतदार व्यक्तिरेखांच्या माध्यमातून या मोहिमेला जिवंत करते. यामध्ये प्रत्येक पार्टीमध्ये नेहमीच आपल्या भन्नाट डान्स मूव्ह्जने रंगत आणणारा पार्टी बडी, नेहमीच साहसासाठी तयार असणारा ट्रॅव्हल बडी, आणि प्रत्येक प्रसंगी आपुलकीसोबत मजाही घेऊन येणारा तो "कूल आंटी" बडी यांचाही समावेश आहे!

लुकलुकणाऱ्या सणासुदीच्या रोषणाईच्या आणि मनाला भुरळ घालणाऱ्या ठेक्याच्या पार्श्वभूमीवर, कॅलिफोर्निया बदाम ग्राहकांना आपली कॉन्टॅक्ट लिस्ट पुन्हा पाहण्यास आणि ज्यांनी त्यांच्यासाठी नेहमी साथ दिली, अशा व्यक्तींना ओळखण्यास प्रेरित करते.

गोव्यात पोलिसांची मध्यरात्री विशेष मोहीम; ५०० जणांची तपासणी

■ पणजी (दै. संध्या)

गोव्यात ओल्ड गोवा आणि आगशी पोलिसांनी 3 आणि 4 ऑक्टोबरच्या मध्यरात्री संयुक्त विशेष मोहीम राबवली. चोराव, कोर्ली, चिंबल, मेरशी, सांताक्रुझ, शिरीदाव आणि बांबोळी परिसरात ही कारवाई करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान पोलिसांनी सुमारे 500 जणांची तपासणी केली, तर 50 जणांना पुढील चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलं. सार्वजनिक ठिकाणी मद्यपान आणि गैरवर्तन केल्याप्रकरणी 22 जणांवर कारवाई करण्यात आली.

याशिवाय संशयावरून 5 जणांना ताब्यात घेण्यात आलं. मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवल्याचे दोन गुन्हे, तसेच इतर 23 किरकोळ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून नागरिकांना आणि कुटुंबांना त्रास होत असल्याच्या तक्रारीनंतर ही मोहीम राबवण्यात आली.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, सार्वजनिक ठिकाणी कायदा-सुव्यवस्था राखणं आणि नागरिक तसेच पर्यटकांच्या सुरक्षेसाठी अशा विशेष मोहिमा सुरू राहणार आहेत.





पिंपरी-चिंचवड आणि परिसर
शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६
दैनिक संध्या निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

थोडक्यात पण महत्वाचे



पाटील पब्लिक स्कूलच्या सक्षम जाधवची तलवारबाजी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी

पिंपरी: दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे जिल्हा परिषद क्रीडा विभाग आयोजित शालेय तलवारबाजी स्पर्धेमध्ये रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या सक्षम जाधव याने १४ वर्षे खालील वयोगटात उल्लेखनीय कामगिरी केली. इयत्ता सहावी मध्ये शिकणाऱ्या सक्षमने एकूण ६ फेऱ्यांमध्ये प्रत्येकी ५ गुणांचे लक्ष साध्य करीत उत्कृष्ट प्रदर्शन केले आणि सर्व फेऱ्या जिंकल्या. एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या क्रीडा शिक्षिका प्रिया सूर्यवंशी या त्याच्या मार्गदर्शिका आहेत. सक्षम इयत्ता ३ री पासून बालेवाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम मध्ये छत्रपती पुरस्कार प्राप्त श्वेता चंडालिया यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. कासारवाडी प्राथमिक शाळा येथे झालेल्या या स्पर्धेत २४ शाळांनी सहभाग घेतला होता. विविध गट व प्रकारांमध्ये सुमारे ५६ वैयक्तिक खेळाडू आणि १८ संघांनी सहभाग नोंदविला होता. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलमध्ये शालेय अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांना वैयक्तिक व सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये नैपुण्य प्राप्त करण्यासाठी उत्कृष्ट सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात त्यामुळेच सक्षम जाधव याला हे यश प्राप्त झाले असल्याचे प्राचार्य डॉ. बिंदु सैनी यांनी सांगितले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सक्षम जाधव, क्रीडा शिक्षिका प्रिया सूर्यवंशी, मुख्याध्यापिका पद्मावती बंडा यांचे अभिनंदन केले.

पैशांच्या वादातून खून, एकास अटक

पिंपरी: दैनिक संध्या

पैशांच्या देवाणघेवाणीच्या वादातून एका व्यक्तीवर चाकूने वार करून त्याचा खून केला. ही घटना थेरगाव परिसरातील मधुबन कॉलनी येथे सोमवारी (दि.०५) रोजी सकाळी पावणेआठच्या सुमारास घडली. आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. यल्लालिंग ऊर्फ यल्लाप्पा शिवशरणप्पा आळंदकर (रा. थेरगाव) याला अटक केली आहे. याबाबत मयत व्यक्तीच्या पत्नीने काळेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांच्या ओळखीचा असलेला आरोपी आळंदकर हा फिर्यादी यांच्या घरी आला. तेथे पैशांच्या देवाणघेवाणीवरून वाद सुरू झाला. या वादातून आरोपीने फिर्यादीचे पती काशीनाथ संभाजी वावळे यांच्यावर धारदार चाकूने सलग चार ते पाच वेळा वार केले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या काशीनाथ यांचा मृत्यू झाला. पुढील तपास काळेवाडी पोलीस करीत आहेत.

४१५ मॉडिफाइड सायलेन्सर आणि ५९१ फॅन्सी नंबर प्लेट्सवर रोड रोलर

पिंपरी: दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाने ध्वनी प्रदूषण आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई करत गेल्या महिनाभरात जप्त केलेले ४१५ मॉडिफाइड सायलेन्सर आणि ५९१ अनधिकृत फॅन्सी नंबर प्लेट्स रोड रोलरच्या सहाय्याने नष्ट केले. वाहतूक विभागाने विशेष मोहीम राबवून ही कारवाई केली असून, कर्णकर्कश आवाज करणाऱ्या मॉडिफाइड सायलेन्सरमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि गरोदर महिलांना अशा वाहनांमुळे होणारा त्रास लक्षात घेऊन पोलिसांनी कठोर भूमिका घेतली आहे. चालू वर्षातील ही पोलिसांची तिसरी मोठी कारवाई असून, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना यामधून स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. तसेच वाहनधारकांनी शासनमान्य एचएसआरपी (High Security Registration Plate) नंबर प्लेट्सच वापराव्यात, असे आवाहन वाहतूक विभागाने केले आहे. बेकायदेशीर मॉडिफाइड सायलेन्सर बसवून देणारे दुकानदार, गॅरेज चालक आणि मेकॅनिक यांच्यावरही कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. याबाबत माहिती देताना सहाय्यक पोलिस आयुक्त (वाहतूक) निलेश देशमुख यांनी सांगितले की, वाहतूक नियमांचे पालन आणि ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी अशा प्रकारच्या मोहिमा पुढेही सातत्याने राबविण्यात येणार आहेत. नागरिकांनी नियमांचे पालन करून सुरक्षित आणि शिस्तबद्ध वाहतुकीस सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

पिंपरी-चिंचवडकरांना पाणीटंचाईची चिंता

पिंपरी: दैनिक संध्या

पिंपरी: पिंपरी-चिंचवड शहराला 770 एमएलडी पाण्याची आवश्यकता असताना 665 एमएलडी पाणीपुरवठा होत असल्यामुळे विविध भागात कमी दाबाने आणि अपुऱ्या प्रमाणात पाणीपुरवठ्याच्या तक्रारी कायम आहेत; मात्र एल निनोच्या प्रभावामुळे राज्यभरातील पर्जन्यमानात मोठी घट झाल्याने पुढील वर्षभराचा विचार करता 16 ऑक्टोबरपासून शहरात आणखी दहा टक्के पाणीकपात लागू करण्याचे आदेश राज्याच्या जलसंपदा विभागाने दिले आहेत. आजच्या घडीला 105 एमएलडी पाण्याची तूट असताना आणखी पाणीकपात होणार असल्यामुळे नागरिकांच्या तोंडचे पाणी पळणार आहे. शहराला सद्यस्थितीत पवना धरणातून 540 एमएलडी, आंद्रा धरणातून 95 एमएलडी आणि एमआयडीसीकडून 30 एमएलडी असा एकूण 665 एमएलडी पाणीपुरवठा दररोज सुरू आहे. शहराला 25 नोव्हेंबर 2019 पासून दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. या निर्णयाला पुढील महिन्यात सात वर्ष पूर्ण होतील. त्यानंतरही दिवसाआडच पाणीपुरवठा सुरू आहे. राज्यात यंदा पावसाने मोठी ओढ दिल्याने दुष्काळाचे चित्र अधिक गडद झाले आहे. राज्यातील आणि पुणे जिल्ह्यात काही तालुक्यात सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. एल निनोच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागात पर्जन्यमानात मोठी घट झाली आहे. असे असले तरी पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणारे पवना आणि आंद्रा धरण 100 टक्के भरले होते. मंगळवार (दि. 6) अखेर पवना धरणात 100 तर, आंद्रा धरणात 92 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 16 ऑक्टोबरपासून दहा टक्के पाणीकपात करण्याचे आदेश जलसंपदा विभागाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना दिला आहे. या आदेशाची पिंपरी-चिंचवड शहरातही अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यानुसार, महापालिकेसाठी पवना आणि आंद्रा धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामध्ये कपात होणार आहे. सध्या शहराला 770 एमएलडी पाण्याची आवश्यकता असताना 665 एमएलडी पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे सध्यस्थितीत शहरातील विविध भागातून कमी दाबाने, अपुऱ्या पाण्याच्या सातत्याने तक्रारी येत आहेत.

‘आय.आय.एम.’ उभारणीला गती; प्रस्तावित जागेची पाहणी

आमदार महेश लांडगे यांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीला वेग, पिंपरी-चिंचवडमध्ये शैक्षणिक, संशोधन व पायाभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा



■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवडच्या शैक्षणिक विकासाला नवी दिशा देणाऱ्या भारतीय व्यवस्थापन संस्था (आय.आय.एम.) च्या मोशी येथील प्रस्तावित कॅम्पसच्या उभारणीच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे. आय.आय.एम. पुणे संस्थेच्या उभारणीसाठी प्रस्तावित जागेची बुधवारी (दि. ७) प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान संस्थेच्या उभारणीसाठी आवश्यक जमीन, पायाभूत सुविधा, प्रशासकीय बाबी आणि भविष्यातील विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून मोशी येथे आय.आय.एम.चे कॅम्पस उभारण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्र शासनाने मोशी येथील शासकीय जमीन आय.आय.एम. नागपूरच्या शैक्षणिक व प्रशिक्षण कॅम्पससाठी उपलब्ध करून देण्यास मंजुरी दिली आहे. जुलै २०२६ मध्ये केंद्र सरकारच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, मोशी येथे ७० एकर क्षेत्रावर पूर्ण क्षमतेचे शैक्षणिक व निवासी कॅम्पस विकसित करण्याची योजना असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर आय.आय.एम. नागपूरच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष सी. पी. गुरनानी, सदस्य प्रा. भीमराया मेट्री, अरुण अनंत व प्रा. प्रशांत गुप्ता, तसेच बांधकाम समितीचे अध्यक्ष वैभव डांगे आणि सदस्य आशु तोमर, प्रा. सोम शेखर भट्टाचार्य व प्रा. राठ यांनी प्रस्तावित जागेची पाहणी केली.

महसूल विभागाचे मंडल अधिकारी श्री. सैद व संबंधित तलाठी, तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नगररचना विभागाचे अधिकारी जगदाळे व बोऱ्हाडे यांनी जागेची सद्यस्थिती, उपलब्ध क्षेत्र, प्रशासकीय प्रक्रिया आणि आवश्यक पायाभूत सुविधांची माहिती दिली. यावेळी आमदार महेश लांडगे यांचे स्वीय सहाय्यक अनिकेत गायकवाड उपस्थित होते.

स्थळ पाहणीदरम्यान प्रस्तावित कॅम्पसच्या उभारणीसाठी आवश्यक विविध बाबींचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. तसेच भविष्यातील शैक्षणिक, संशोधनात्मक व विकासात्मक प्रकल्प, विद्यार्थी व प्रशिक्षणार्थींसाठी आवश्यक सुविधा, पायाभूत सुविधा आणि संस्थेच्या उभारणीसाठीची पुढील प्रशासकीय कार्यवाही याबाबत उपस्थित मान्यवर आणि अधिकाऱ्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली. आय.आय.एम.च्या पुणे कॅम्पससाठी मोशीची निवड झाल्यास पिंपरी-चिंचवडच्या शैक्षणिक परिसंस्थेला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. व्यवस्थापन शिक्षण, कौशल्यविकास, संशोधन आणि उद्योग-शिक्षण क्षेत्रातील सहकार्याला यामुळे नवे व्यासपीठ उपलब्ध होऊ शकते. आय.आय.एम. नागपूरने यापूर्वीही पुणे कॅम्पससाठी औद्योगिक पट्ट्याशी जोडलेले आणि शहराशी चांगली कनेक्टिव्हिटी असलेले स्थान आवश्यक असल्याचे स्पष्ट केले होते.

> “पिंपरी-चिंचवडमध्ये जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्था उभ्या राहाव्यात, हा माझा सातत्याने प्रयत्न आहे. आय.आय.एम.सारखी प्रतिष्ठित संस्था आपल्या शहरात उभी राहणे ही केवळ शैक्षणिक क्षेत्रासाठी नव्हे, तर संपूर्ण परिसराच्या भविष्यासाठी महत्त्वाची बाब आहे. या संस्थेमुळे उच्च दर्जाचे व्यवस्थापन शिक्षण, संशोधन, कौशल्यविकास आणि उद्योग क्षेत्राशी समन्वयाला मोठी चालना मिळेल. आज झालेली प्रस्तावित जागेची स्थळ पाहणी हा या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या पुढील वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा आहे. आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक बाबींची पूर्तता करून हा प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन, प्रशासन आणि संबंधित संस्थांच्या समन्वयातून पाठपुरावा सुरू राहील. पिंपरी-चिंचवडला शिक्षण, संशोधन आणि नवउद्योजकतेचे महत्त्वाचे केंद्र बनविण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.”
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

२ घरफोड्यांसह २ वाहनचोरीचे गुन्हे उघड, दोन आरोपींना अटक

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या युनिट ४ ने उल्लेखनीय कामगिरी करत दोन घरफोडी आणि दोन वाहनचोरी असे एकूण चार गुन्हे उघडकीस आणले आहेत. या कारवाईत दोन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून सुमारे १ लाख ४० हजार रुपये किमतीच्या दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

पोलीस आयुक्तालय हद्दीत ६ ऑक्टोबर रोजी गुन्हे प्रतिबंधक गस्तीदरम्यान गुन्हे शाखा युनिट ४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन घोडे पाटील, सहायक पोलीस निरीक्षक श्रीधर भोसले आणि त्यांच्या पथकाने संशयित आरोपी रुषिकेश राजेंद्र भोसले (वय २५, रा. विठ्ठलवाडी, देहूगाव) व अशोक राजेंद्र भोसले (वय २५, रा. विठ्ठलवाडी, देहूगाव) यांच्यासह अन्य तिघांना ताब्यात घेतले. तपासादरम्यान आरोपींकडून एमएच १३ सीए ८६२८ आणि एमएच १४ बीडब्ल्यू ३९२७ या क्रमांकाच्या दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या. त्यानंतर करण्यात आलेल्या सखोल चौकशीत आरोपींनी चिखली पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन घरफोड्या केल्याची कबुली दिली.

या कारवाईत उत्तर चाकण पोलीस ठाणे, उत्तर महाळुंगे पोलीस ठाणे, चिखली पोलीस ठाणे, चिखली पोलीस ठाणे हद्दीतील चार गुन्ह्यांचा उलगडा केला आहे. ताब्यात घेतलेल्या आरोपींपैकी काहींना पुढील कारवाईसाठी उत्तर चाकण पोलीस ठाण्यात, तर इतर आरोपींना वैद्यकीय तपासणीनंतर उत्तर महाळुंगे पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सहपोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, पोलीस उपायुक्त (गुन्हे) डॉ. रोहिदास पवार आणि सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे-१) डॉ. सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन घोडेपाटील यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्रीधर भोसले व गुन्हे शाखा युनिट ४ च्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली.

‘दीक्षारंभ २०२६’ मध्ये वास्तुकलेच्या अभ्यासाची अनुभवाधारित ओळख

■ पिंपरी (दै. संध्या)

वास्तु विशारद शाखेतील विद्यार्थ्यांना देहू, आळंदी येथील ऐतिहासिक वास्तू या स्थानिक सांस्कृतिक परंपरा, परिसराचा संदर्भ आणि वास्तुकला यांच्यातील परस्परसंबंध समजून घेण्यासाठी मार्गदर्शक आहेत. या वास्तू केवळ भौतिक रचना नसून तिच्यामागे इतिहास, संस्कृती, परंपरा, स्थानिक जीवनशैली आणि परिसराशी असलेले नाते दडलेले असते. वास्तुकला ही समाज, संस्कृती, पर्यावरण आणि मानवी जीवनाशी जोडलेली सर्जनशील प्रक्रिया आहे ती समजून घेऊन आर्किटेक च्या विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवावे असे एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईनच्या प्राचार्य डॉ. स्मिता सूर्यवंशी यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईनमध्ये प्रथम वर्ष बी.आर्क.च्या विद्यार्थ्यांचे ‘दीक्षारंभ २०२६’ कार्यक्रमात मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले.

या प्रथम वर्ष स्वागत समारंभातील विद्यार्थ्यांना पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर यांनी शुभेच्छा दिल्या.

नेहरूनगर न्यायालय परिसरातील कोंडीवर दुहेरी उपाययोजना

■ पिंपरी (दै. संध्या)

नेहरूनगर न्यायालय परिसरातील अपुरी पार्किंग व्यवस्था, वाढती वाहतूक कोंडी आणि रस्त्याच्या दुतर्फा नोटरी व्यवसाय करणाऱ्या वकिलांच्या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. अण्णासाहेब मगर स्टेडियमच्या आतील बाजूस उपलब्ध मोकळ्या जागेत तात्पुरत्या स्वरूपात वाहनतळाची व्यवस्था करण्यासह नोटरी व्यवसाय करणाऱ्या वकिलांसाठी स्वतंत्र, सुसज्ज जागा उपलब्ध करून देण्याच्या पर्यायाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

महापौर रवी लांडगे, क प्रभाग अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे आणि क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे-पाटील यांच्याकडे बार असोसिएशनने निवेदनाद्वारे या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते.

त्यानंतर क प्रभाग अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे आणि क क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे-पाटील यांनी अण्णासाहेब मगर स्टेडियम तसेच नेहरूनगर न्यायालय परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली.

वाकडच्या अंडरपासमध्ये टेम्पो कॉलमला धडकला

■ वाकड (दै. संध्या)

टेम्पोच्या टपावर बसलेल्या तरुणाच्या मृत्यूला कारणीभूत ठरल्याप्रकरणी वाकड पोलिसांनी टेम्पोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना ६ ऑक्टोबर रोजी दुपारी सव्वादोनच्या सुमारास सोलिटेअर सोसायटी, पिंक सिटी रोड, वाकड येथील अंडरपासमध्ये घडली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी चालक तुषार ज्योतीराम माने (वय २२, रा. आदर्श कॉलनी, वाकड) हा टाटा टेम्पो (एमएच १४ एलबी ४५९८) चालवत होता. या टेम्पोच्या टपावर ऋषी धनंजय कुदळे (वय २०, रा. लक्ष्मीनगर, थेरगाव) हा बसला असल्याची चालकाला माहिती होती. असे असतानाही चालकाने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून टेम्पो भरधाव व निष्काळजीपणे अंडरपासमधून नेला. यावेळी टेम्पो अंडरपासमधील कॉलमला धडकला. या अपघातात टपावर बसलेल्या ऋषी कुदळे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या प्रकरणी धनंजय श्रीनिवास कुदळे (वय ५०, रा. महादेव कॉलनी, लक्ष्मीनगर, थेरगाव) यांनी फिर्याद दिली.

भाजपाच्या ‘सेवा ज्योती यात्रे’तून विकसित भारताचा संकल्प

भोसरीत ‘विकसित भारत संकल्प सभा व सेवा ज्योती यात्रा’ शहर भाजपा-पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या एकजुटीचे शक्तिप्रदर्शन

■ पिंपरी (दै. संध्या)

भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याच्या वतीने आयोजित ‘विकसित भारत संकल्प सभा व सेवा ज्योती यात्रा’ भोसरी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राष्ट्रविकास, जनसेवा आणि संघटनबळ अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करत भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ‘विकसित भारत’ संकल्पनेचा जयघोष केला.

भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या संकल्प सभा व यात्रेला पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सेवा, सुशासन आणि विकास या त्रिसूत्रीच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. केंद्र व राज्य सरकारच्या विविध विकासाभिमुख योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासह राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.



यावेळी भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. संघटन अधिक सक्षम करण्यासोबतच केंद्र आणि राज्य सरकारच्या विकासकामांची माहिती जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘विकसित भारत’ संकल्पनेला जनसहभाग आणि कार्यकर्त्यांच्या सक्रिय योगदानाची जोड देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास आमदार शंकर जगताप, उमाताई खापरे, अमित गोरखे, महापौर रवी लांडगे, गटनेते प्रशांत शितोळे, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, विकास डोळस, मधुकर बच्चे, संजय पटनी, वैशाली खाड्ये, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे, नवनगर विकास प्राधिकरणचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, दक्षिण भारतीय आघाडी प्रभारी राजेश पिल्ले यांच्यासह सर्व मंडलाध्यक्ष, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

‘सेवा ज्योती यात्रा’च्या माध्यमातून राष्ट्रसेवा, जनसेवा आणि विकासाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती आणि उत्स्फूर्त सहभागामुळे भोसरी परिसरात भाजपाच्या संघटनशक्तीचे दर्शन घडले. ‘संकल्प विकासाचा, ज्योत सेवेची आणि ध्यास विकसित भारताचा’ या भावनेतून आयोजित करण्यात आलेली ही यात्रा आगामी काळात संघटन अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा देणारी ठरली.

> “‘विकसित भारत’ ही केवळ संकल्पना न राहता ती प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्याची आणि नागरिकांची आहे. सेवा, सुशासन आणि विकासाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न आपण सातत्याने केला पाहिजे. ‘सेवा ज्योती यात्रा’च्या माध्यमातून राष्ट्रसेवेची भावना अधिक दृढ झाली असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेला जनसहभागाची जोड देत विकासाच्या प्रवाहात प्रत्येक घटकाला सहभागी करून घेण्याचा निर्धार आपण करूया. संघटनेची ताकद ही कार्यकर्त्यांच्या एकजुटीत आहे आणि हीच एकजूट राष्ट्रनिर्माणाच्या कार्याला अधिक बळ देईल.”
>
> — महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

थोडक्यात पण महत्वाचे



विघ्नेश्वराच्या दर्शनाने अश्वमेघ युवा मंचाच्या अष्टविनायक यात्रेला सुरुवात

नारायणगाव : दैनिक संध्या

दरवर्षीप्रमाणे यंदाही अश्वमेघ युवा मंच परिवाराच्या वतीने अष्टविनायक यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेची सुरुवात श्री क्षेत्र ओझर येथील श्री विघ्नेश्वर गणपतीच्या दर्शनाने भक्तिमय वातावरणात झाली. यावेळी अश्वमेघ युवा मंचाच्या वतीने मंदिरात महाआरती करण्यात आली. यात्रेत मंचाचे नवनिर्वाचित पदाधिकारी, सदस्य तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने सहभागी झाला. महाराष्ट्रावरील दुष्काळाचे संकट लवकर दूर व्हावे, राज्यातील नागरिकांना सुख, समाधान व सुरक्षितता लाभावी, तसेच शेतकरी बांधवांच्या जीवनात पुन्हा समृद्धी नांदावी. त्यांच्या कष्टाला योग्य फळ मिळावे. अशी प्रार्थना श्री विघ्नेश्वर गणरायाच्या चरणी करण्यात आली. भक्ती, श्रद्धा आणि एकतेच्या वातावरणात सुरू झालेली ही अष्टविनायक यात्रा आनंदात पार पडावी, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. जी आमदार स्व. सुरेशभाऊ गोरे यांचा शनिवारी (दि.१०) ६ वा स्मृतिदिन आहे. त्यानिमित्त चाकण येथे कर्तृत्ववान नागरिकांचा कृतज्ञता पुरस्काराने सन्मान तसेच सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. चाकण येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात या पुण्यस्मरण दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात दुपारी ३ वाजता स्व. आ. सुरेशभाऊ गोरे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात येणार आहे. यावेळी त्यांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच सामाजिक व विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा 'कृतज्ञता सन्मान पुरस्कार' देऊन गौरव होणार आहे. प्रसिद्ध रामायणाचार्य हभप. समाधान महाराज शर्मा यांची सुश्राव्य कीर्तन सेवा संपन्न होणार आहे. या कीर्तन सेवेमुळे पुण्यस्मरण सोहळ्याला भक्तिमय वातावरणाची जोड मिळणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व नगरसेवक नितीन गोरे, उद्योजक विकास गोरे, दत्तात्रय गोरे, माणिक गोरे, ओंकार गोरे, निलेश गोरे, स्व.आ. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठान खेड तालुका व गोरे कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आले आहे.

चाकण येथे शनिवारी स्व.आ. सुरेशभाऊ गोरे यांचा स्मृतिदिन



चाकण : दैनिक संध्या

खेड तालुक्याचे माजी आमदार स्व. सुरेशभाऊ गोरे यांचा शनिवारी (दि.१०) ६ वा स्मृतिदिन आहे. त्यानिमित्त चाकण येथे कर्तृत्ववान नागरिकांचा कृतज्ञता पुरस्काराने सन्मान तसेच सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. चाकण येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात या पुण्यस्मरण दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात दुपारी ३ वाजता स्व. आ. सुरेशभाऊ गोरे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात येणार आहे. यावेळी त्यांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच सामाजिक व विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा 'कृतज्ञता सन्मान पुरस्कार' देऊन गौरव होणार आहे. प्रसिद्ध रामायणाचार्य हभप. समाधान महाराज शर्मा यांची सुश्राव्य कीर्तन सेवा संपन्न होणार आहे. या कीर्तन सेवेमुळे पुण्यस्मरण सोहळ्याला भक्तिमय वातावरणाची जोड मिळणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व नगरसेवक नितीन गोरे, उद्योजक विकास गोरे, दत्तात्रय गोरे, माणिक गोरे, ओंकार गोरे, निलेश गोरे, स्व.आ. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठान खेड तालुका व गोरे कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आले आहे.

शेंडगेवाडी, आलेगाव पागा तलाव कोरडेठाक; दिवाळीतच दुष्काळाचे सावट

रांजणगाव सांडस : दैनिक संध्या

शिरूर तालुक्यातील शेंडगेवाडी आणि आलेगाव पागा येथील तलाव कोरडेठाक पडले असून, चासकमान धरणाच्या आवर्तनातून या तलावांत पाणी सोडावे, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे. आवर्तन न मिळाल्यास ऐन दिवाळीत या भागाला भीषण दुष्काळाचा सामना करावा लागेल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. यंदा आमदार माऊली आबा कटके यांनी विशेष लक्ष घालून पाणी सोडावे, असे साकडे त्यांना घालण्यात आले आहे. शेंडगेवाडी तलाव गेल्या पाच महिन्यांपासून पूर्णपणे कोरडा आहे. पावसाळा संपताच अवघ्या दोन महिन्यांत हा तलाव कोरडाठाक पडतो. त्यामुळे दरवर्षी या तलावाला दुष्काळाचा शाप असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. शेंडगेवाडी आणि आलेगाव पागा हे दोन्ही तलाव चासकमानच्या आवर्तनावरच पूर्णपणे अवलंबून आहेत. आवर्तन सोडले तरच ते भरतात, अन्यथा वर्षभर कोरडे राहतात. आंबळे भागातील चासकमानच्या चारी क्र. १९ मधून उरळगाव, कोळपे वस्ती, तांबे वस्ती परिसरातून पाणी आलेगाव पागा व शेंडगे वस्ती तलावात सोडले जाते. आलेगाव पागा, व्हावरे यांच्या शिवशेजारील चारीतून दोन्ही तलाव पूर्ण क्षमतेने भरावेत, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. या तलावांत पाणी आल्यास परिसरातील बोअरवेल आणि विहिरींच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ होते. त्यामुळे शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मार्गी लागतो. तलावाच्या परिसरात अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी आहेत. तलाव पूर्ण क्षमतेने न भरल्यास या शेतकऱ्यांना ऐन दिवाळीत पाणीटंचाईचा सामना करावा लागणार असल्याची वस्तुस्थिती ग्रामस्थांनी मांडली. वरच्या भागातून पाणी न सोडल्यास परिसराला भीषण दुष्काळाला तोंड द्यावे लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मक्याच्या भाकरीऐवजी मुरघासाला मका, इंदापुरात शेतकऱ्यांचा वेगळाच हिशेब

इंदापूर : दैनिक संध्या

अपुरा पाऊस आणि सप्टेंबर-ऑक्टोबरमधील कडक उन्हामुळे इंदापूर तालुक्यात मक्याचे पीक करपत चालले आहे. उत्पादनाची खात्री नसल्याने शेतकऱ्यांचा मका धान्यासाठी काढण्यापेक्षा मुरघासासाठी जागेवरच विकण्याकडे कल वाढला आहे. त्यामुळे यंदा बाजार समितीत मक्याची आवक घटण्याची शक्यता असून, भविष्यात ताटातील मक्याची भाकरीही महागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इंदापूर तालुक्यात मक्याखालील सरासरी क्षेत्र ६५००.१६ हेक्टर आहे. हमखास उत्पन्न देणारे पीक म्हणून मका ओळखला जातो.

धनादेश अनादर प्रकरणी आरोपीला सहा महिने कारावास

■ जुन्नर : (दै. संध्या)

जुन्नर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी नम्रता महादेव बिरादार यांनी धनादेश अनादर प्रकरणात आरोपी रितेश सुभाष घोलकर(रा. कात्रज, पुणे; प्रोप्रायटर, मे. सक्सेस पेस्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस) यास दोषी ठरवून, नेगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्ट कलम १३८ अन्वये सहा महिने सश्रम कारावास व रु १० लाख दंड अशी शिक्षा सुनावली.

जुन्नर येथील व्यावसायिक योगेश सुरेश दुबे यांनी जानेवारी २०१९ मध्ये मैत्रीच्या नात्यातून आरोपीला रु .५ लाख रोख हातउसने दिले होते. परतफेडीपोटी आरोपीने १ ऑक्टोबर २०२३ रोजीचा रु.५ लाखांचा धंनादेश दिला.

खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने तो धंनादेश न वटता परत आला. आरोपीला कायदेशीर नोटीस देऊनही आरोपीने मुदतीत रक्कम न दिल्याने दुबे यांनी न्यायालयात फिर्याद दाखल केली. फिर्यादी योगेश दुबे यांच्या वतीने ॲड. वैभव आय. परदेशी, जुन्नर यांनी न्यायालयात बाजू मांडली. चेकवरील सही आरोपीने नाकारली नाही, बँकेचा रिटर्न मेमो आणि नोटीस मिळाल्याचे पुरावे रेकॉर्डवर आहेत, तसेच कायदेशीर गृहीतक आरोपी खोडून काढू शकला नाही, असा युक्तिवाद ॲड. परदेशी यांनी केला. तो न्यायालयाने ग्राह्य धरला.

चेकबुक हरवले होते आणि चेकचा गैरवापर झाला, असा बचाव आरोपीने घेतला. मात्र त्यासाठी कोणतीही पोलीस तक्रार, साक्षीदार किंवा स्वतःची साक्ष त्याने न्यायालयात सादर केली नाही.

लिखित करार नसल्याने कर्ज सिद्ध होत नाही, हा युक्तिवादही न्यायालयाने मान्य केला नाही. चेक आरोपीच्या खात्याचा असल्याने कायद्यानुसार तो कर्जफेडीसाठी दिल्याचे गृहीतक लागू होते आणि ते आरोपी खोडून काढू शकला नाही, असे न्यायालयाने नमूद केले. - रु.१० लाख दंड (न भरल्यास एक महिना साधी कैद). ही संपूर्ण रक्कम अपील मुदतीनंतर फिर्यादीस नुकसानभरपाई म्हणून मिळेल. खटल्याचा खर्च १०००० (न भरल्यास १० दिवस साधी कैद) शिक्षेवरील सुनावणीसाठी आरोपी हेतुपुरस्सर गैरहजर राहिल्याने न्यायालयाने त्याचे म्हणणे ऐकल्याशिवाय निकाल दिला. फिर्यादी बऱ्याच काळापासून निकालाची प्रतीक्षा करत असल्याने आणखी विलंब योग्य नाही, असे न्यायालयाने म्हटले. आरोपीला ३० दिवसांत सत्र न्यायालयात अपील करता येईल.

दिवाळीच्या तोंडावर भीमाशंकरकडून कवठे येमाईत स्वस्त दरात साखर वाटप



■ कवठे येमाई (दै. संध्या)

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर साखर कारखान्याकडून कवठे येमाई येथे साखर उपलब्ध करून देण्यात आली असून, अवघ्या २० रुपये प्रति किलो दराने साखर मिळत असल्याने ऊस उत्पादक शेतकरी व नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, एका बाजूला दिवाळीची लगबग सुरू असताना दुसऱ्या बाजूला पावसाने पाठ फिरवल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहेत. त्यामुळे साखर स्वस्त मिळत असली, तरी शेतकऱ्यांसमोरील अस्मानी संकट मात्र कायम असल्याचे चित्र आहे.

भीमाशंकरकडून उपलब्ध झालेली साखर २० रुपये किलो दराने मिळत असल्याने सर्वसामान्य नागरिकांनी समाधान व्यक्त केले. मात्र, साखर खरेदीसाठी डिजिटल पेमेंटची सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक शेतकरी व ग्राहकांची गैरसोय झाली. सध्याच्या डिजिटल व्यवहारांच्या काळात रोख रक्कम उपलब्ध नसल्याने काही नागरिकांना साखर खरेदी करताना अडचणींचा सामना करावा लागला. भविष्यात अशा वितरण केंद्रांवर रोख रकमेसोबतच UPI अथवा इतर डिजिटल पेमेंटची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आहे.

दरम्यान, कवठे येमाई परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष मात्र आकाशाकडे लागले आहे. खरीप पिकांसाठी आवश्यक असलेल्या पावसाने दडी मारल्याने पिकांची अवस्था चिंताजनक होत चालली आहे.

आधीच वाढलेला उत्पादन खर्च, महागडी बियाणे-खते, मजुरी आणि इतर शेती खर्चाचा भार शेतकऱ्यांवर आहे. त्यात पावसाची अनिश्चितता वाढल्याने हातातोंडाशी आलेला खरीप हंगाम वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव गावडे यांनी शेतकऱ्यांच्या परिस्थितीकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त केली. "२० रुपये किलो दराने साखर मिळणे ही निश्चितच दिलासादायक बाब आहे; मात्र शेतकऱ्यांच्या शेतातच जर पिके उभी राहत नसतील, तर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा होणार?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

शेतकरी विठ्ठलराव गावडे व सुनील रत्नपारखी यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांनीही पावसाच्या प्रतीक्षेबाबत मोठी चिंता व्यक्त केली. सध्या पावसाची अत्यंत गरज असून, वेळेत पाऊस न झाल्यास खरीप पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे शासन व प्रशासनाने परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत व मार्गदर्शन तातडीने उपलब्ध करून द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.दिवाळीच्या तोंडावर स्वस्त साखरेचा गोडवा मिळत असला, तरी पावसाअभावी शेतकऱ्यांच्या डोळ्यांत मात्र चिंतेचे अश्रू आहेत.

सणाचा उत्साह आणि शेतकऱ्यांची आर्थिक विवंचना यातील विरोधाभास कवठे येमाई परिसरात स्पष्टपणे जाणवत आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी

■ आळंदी (दै. संध्या)

दिवेआगर येथे सहलीसाठी गेलेल्या आळंदीतील आठ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर प्रशासनाने विनर्स अकादमीची संबंधित मालमत्ता सील केली आहे. या कारवाईचे पालन करताना अकादमीत शिक्षण घेणाऱ्या अन्य विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, अशी मागणी नगरसेवक हेमंत ऊर्फ सागर गुलाबराव कुऱ्हाडे यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.

दुर्घटनेनंतर प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून विनर्स अकादमीची मालमत्ता सील केली. मात्र, क्लासेस बंद झाल्याने अनेक विद्यार्थ्यांच्या नियमित शिक्षणात व्यत्यय निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांच्या अभ्यासक्रम व परीक्षेच्या तयारीवर परिणाम होऊ नये, यासाठी तातडीने पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली आहे.

संबंधित शिक्षण विभाग व सक्षम प्राधिकरणांशी समन्वय साधून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरक्षित ठिकाणी सुरू ठेवण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. तसेच पालकांची चिंता आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन निर्णय घ्यावा, असे कुऱ्हाडे यांनी पत्रात नमूद केले आहे.

"दुर्दैवी घटनेची वेदना विसरता येणार नाही; परंतु त्या वेदनेतून निरपराध विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय होऊ नये, हीच प्रशासनाची खरी संवेदनशीलता ठरेल," असे नगरसेवक सागर कुऱ्हाडे यांनी म्हटले आहे.



ओतुर येथे ११.८७ लाखांचा ऐवज लंपास

■ नारायणगाव(दै. संध्या)

ओतूर येथील चैतन्य रोड परिसरात बंद बंगल्याचे कडी-कोयंडे तोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने, हिऱ्यांचे दागिने आणि तीन लाख रुपयांची रोकड असा एकूण ११ लाख ८७ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. भरवस्तीत झालेल्या या चोरीच्या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी चैतन्य रोड येथील रहिवासी डॉ. कमलेश विजय घोलप यांनी याबाबत ओतूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. डॉ. कमलेश घोलप आणि त्यांच्या पत्नी डॉ. राधिका घोलप हे १ ऑक्टोबर रोजी रात्री घराला कुलूप लावून पुण्याला गेले होते. ४ ऑक्टोबर रोजी रात्री ते घरी परतले असता घराच्या दरवाजाचा कडी-कोयंडा तुटलेला आढळून आला.

शिक्षक दत्तात्रय गायकवाड यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

■ इंदापूर (दै. संध्या)

श्री काळभैरवनाथ विद्यालय कळाशीचे शिक्षक व पतंजली योग परिवार कालठण नं. १ चे योग शिक्षक *श्री. दत्तात्रय दिनकर गायकवाड* यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय **आदर्श शिक्षक पुरस्काराने** सन्मानित करण्यात आले.

एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय आदर्श संस्था, आदर्श शाळा, आदर्श मुख्याध्यापक, आदर्श शिक्षक व आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार सोहळा व शिक्षक मेळावा २०२६ मध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी जिजाऊ मंगल कार्यालय, कुंजीरवाडी (पुणे) येथे झालेल्या या सोहळ्यात राज्याचे रोहयो मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री *मा. ना. श्री. भरत (शेठ) गोगावले* यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार शरद (बापू) सोनवणे, माजी आमदार रवींद्र धंगेकर, मंगेश चिवटे, बापूसाहेब अडसूळ यासह विविध मान्यवर, शिक्षक संघटनांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते.

गायकवाड सरांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्राधान्य देत विद्यार्थीकेंद्रीत उपक्रम, नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. त्यांच्या समर्पित कार्याची दखल घेत त्यांची या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

शिरूर तालुका राज्य मराठी पत्रकार संघाच्यावतीने शालेय साहित्य वाटप व पुरस्कार वितरण सोहळा

■ शिरूर (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या शिरूर तालुका शाखेच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी शिरूर येथील विद्याधाम प्रशालेसमोर असलेल्या राजभोग बँक्वेट हॉलमध्ये आयोजित करण्यात आला असून समाजिक उपक्रम राबवण्याचे पत्रकार संघाचे हे १५ वे वर्षे आहे.

या कार्यक्रमास जागतिक उद्योगपती मा. श्री. प्रकाशभाऊ धारिवाल यांचे शुभहस्ते लाभणार असून, आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली आबा कटके कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. कार्यक्रमास ज्येष्ठ सिनेअभिनेते सुनील गोडबोले, शिरूर नगराध्यक्षा ऐश्वर्याताई पाचर्णे, माजी आमदार ॲड अशोकबापू पवार, तहसीलदार बाळासाहेब म्हस्के, पंचायत समितीच्या सभापती स्वातीताई विठ्ठल घावटे, राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र भोसले, पुणे जिल्हाध्यक्ष सितारामजी लांडगे, शिरूरचे उपनगराध्यक्ष मितेश गादिया यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याची माहिती शिरूर तालुका सं.अध्यक्ष संतोष शिंदे यांनी दिली.

या उपक्रमातून गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून त्यांना शैक्षणिक मदतीचा हात दिला जाणार आहे. तसेच सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, प्रशासन, कला व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमास शिरूर तालुका महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी,सदस्य, नगरसेवक, नगरसेविका तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका अध्यक्ष पत्रकार अर्जुन बढे यांनी केले.यावेळी शहराध्यक्ष बबन वाघमारे, महिला शहराध्यक्ष अश्विनी सांगळे,तालुका उपाध्यक्ष भाऊसाहेब खपके,सचिन जाधव,उमेश कारखिले यांच्यासह संघाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

ज्ञानवर्धिनी विद्यालयात विद्यार्थ्यांना सर्पांविषयी मार्गदर्शन

■ चाकण (दै. संध्या)

स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे यांच्या पुण्यतिथी निमित्त तसेच संस्थेच्या रौप्य महोत्सव वर्ष २०२६ निमित्त स्व. गुलाबराव गोरे प्रतिष्ठान शिक्षण संस्था संचलित ज्ञानवर्धिनी विद्यालय, चाकण, भामा इंग्लिश मीडियम स्कूल, चाकण आणि स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज, चाकण यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानमाला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



सर्पमित्र शरद गुंड यांनी "सर्प विषयक समज-गैरसमज, अध्यात्म आणि विज्ञान" या विषयावर विद्यार्थ्यांना चौफेर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक दीपक गोसावी यांच्या हस्ते झाले. शिक्षक नारायण करपे, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्रिंसिपल माधुरी गोरे, प्राचार्य सचिन आभाळे आदी मान्यवर उपस्थित होते. शरद गुंड यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना समाजामध्ये सापांविषयी असलेल्या विविध समज-गैरसमजांबाबत माहिती देऊन वैज्ञानिक दृष्टिकोनातून सापांकडे पाहण्याचे आवाहन केले.तसेच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष विविध प्रकारचे साप दाखवून त्यांची ओळख करून दिली. कोणते साप विषारी आणि कोणते बिनविषारी आहेत. सापांची वैशिष्ट्ये तसेच सापांपासून घ्यावयाची काळजी याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. शालेय विद्यार्थ्यांना व्याख्यानाच्या माध्यमातून प्रत्यक्ष साप पाहण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली. सर्वजण सापांकडे मोठ्या कुतूहलाने पाहत होते. विद्यार्थ्यांना सर्पांविषयी शास्त्रीय माहिती मिळणे गरजेचे होते. अंधश्रद्धा व गैरसमज दूर करून विज्ञानधारित दृष्टिकोन निर्माण करण्याचा महत्त्वपूर्ण संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

प्रिंसिपल माधुरी गोरे यांनी स्वागत केले. विकास गोरे यांनी प्रास्ताविक केले.

थोडक्यात पण महत्वाचे



ऐतिहासिक वास्तू सांस्कृतिक परंपरा आणि वास्तुकला संबंध समजून घेण्यासाठी मार्गदर्शक

पिंपरी: दैनिक संध्या

वास्तु विशारद शाखेतील विद्यार्थ्यांना देहू, आळंदी येथील ऐतिहासिक वास्तू या स्थानिक सांस्कृतिक परंपरा, परिसराचा संदर्भ आणि वास्तुकला यांच्यातील परस्परसंबंध समजून घेण्यासाठी मार्गदर्शक आहेत. या वास्तू केवळ भौतिक रचना नसून तिच्यामागे इतिहास, संस्कृती, परंपरा, स्थानिक जीवनशैली आणि परिसराशी असलेले नाते दडलेले असते. वास्तुकला ही समाज, संस्कृती, पर्यावरण आणि मानवी जीवनाशी जोडलेली सर्जनशील प्रक्रिया आहे ती समजून घेऊन आर्किटेक च्या विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवावे असे एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईनच्या प्राचार्य डॉ. स्मिता सूर्यवंशी यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईनमध्ये प्रथम वर्ष बी.आर्क.च्या विद्यार्थ्यांचे 'दीक्षारंभ २०२६' कार्यक्रमात मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी आर्किटेक्चर प्रज्ञा आवटे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, वास्तुकलेचा अभ्यास केवळ वर्गातील सैद्धांतिक ज्ञानापुरता मर्यादित नसून प्रत्यक्ष निरीक्षण, अनुभव, प्रयोग, सर्जनशील विचार आणि समूहकार्य यांद्वारे अधिक प्रभावीपणे आत्मसात करता येतो. तसेच टाकाऊ वस्तू पासून मॉडेल मेकिंग तसेच फोटोग्राफीचा वापर कसा करावा याची माहितीही आवटे यांनी दिली. या प्रथम वर्ष स्वागत समारंभातील विद्यार्थ्यांना पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी शुभेच्छा दिल्या.

प्रवाशांनी कृपया लक्ष द्या! नाशिक-मुंबई रेल्वेसेवेला १७ ऑक्टोबरला 'ब्रेक'

मुंबई: दैनिक संध्या

मुंबईला जाणाऱ्या नाशिककरांसाठी ऑक्टोबरच्या मध्यात रेल्वे प्रवासाचे नियोजन कोलमडण्याची शक्यता आहे. आसनगाव-कसारा तिसऱ्या मार्गिकेच्या कामासह कसारा यार्डातील 'अप' यार्ड विस्तारीकरणासाठी १४ ते १८ ऑक्टोबरदरम्यान विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे नाशिक-मुंबई रेल्वेसेवेवर मोठा परिणाम होणार असून १७ ऑक्टोबरला नांदेड-मुंबई वंदे भारत एक्स्प्रेस नाशिक रोडवरच थांबणार आहे. नाशिक रोड ते मुंबईदरम्यानची सेवा रद्द करण्यात आली आहे. याच दिवशी हिंगोली डेक्कन-मुंबई जनशताब्दी आणि हजूर साहिब नांदेड-मुंबई एक्स्प्रेस मनमाडपर्यंतच धावणार आहेत. त्यामुळे नाशिक रोड आणि मनमाड येथून मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांना पर्यायी वाहतुकीचा आधार घ्यावा लागू शकतो. दुसरीकडे मुंबई-नांदेड वंदे भारत मुंबईऐवजी नाशिक रोडवरून, तर मुंबई-हिंगोली जनशताब्दी आणि मुंबई-नांदेड एक्स्प्रेस मनमाडवरून सुरू करण्यात येणार आहेत. ब्लॉकमुळे मुंबई, लोकमान्य टिळक टर्मिनस आणि दादरहून सुटणाऱ्या अनेक लांब पल्ल्याच्या गाड्यांचे मार्गही बदलण्यात आले आहेत. ही गाड्या कल्याण-कर्जत-पुणे-मनमाड, तर काही ठाणे-वसई रोड-नंदुरबार जळगाव मार्गे वळवण्यात येतील. काही गाड्या रद्द करण्यात आल्या असून अनेक गाड्या दोन ते सात तासांपर्यंत विलंबाने धावणार आहेत. त्यामुळे नाशिक-मुंबई रोजचा प्रवास करणारे नोकरदार, विद्यार्थी तसेच मुंबईकडे जाणाऱ्या इतर प्रवाशांची धावपळ होण्याची शक्यता आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांनी प्रवासापूर्वी संबंधित गाडीचे अद्ययावत वेळापत्रक तपासूनच प्रवास करावा, असे आवाहन केले आहे.

दसरा, दिवाळी आणखी सुखात जाणार; खाद्यतेल स्वस्त होणार

नाशिक : दैनिक संध्या

आगामी नवरात्र, दसरा आणि दिवाळी यांसारख्या मोठ्या सणांच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिक आणि गृहिणींसाठी एक दिलासादायक बातमी आहे. बाजारात खाद्यतेलाचा तुटवडा जाणवू नये आणि वाढत्या महागाईवर नियंत्रण राहावे, या उद्देशाने केंद्र सरकारने खाद्यतेलाच्या आयात शुल्कात कपात केली आहे. या निर्णयामुळे येत्या काही दिवसांतच सोयाबीन, सनफ्लॉवर आणि पामतेलाचे किरकोळ बाजारातील दर खाली येण्याची मजबूत शक्यता निर्माण झाली आहे. सणासुदीच्या दिवसांत गोडधोड आणि फराळाचे पदार्थ बनवताना तेलाच्या खर्चाचा फटका बसणाऱ्या गृहिणींचे बजेट आता सुटसुटीत होणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून महागाईमुळे नागरिक मर्यादित प्रमाणात खरेदी करत होते. मात्र आता दर कमी होणार असल्यामुळे घाऊक आणि किरकोळ दोन्ही बाजारांमध्ये खरेदीला मोठा उधाण येण्याची शक्यता आहे. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर व्यापारी वर्गानेही मोठ्या प्रमाणावर नवीन साठ्याची मागणी नोंदवण्यास सुरुवात केली आहे. दिवाळी आणि दसऱ्याच्या काळात फराळासाठी तेलाचा वापर जास्त होतो. महागाईच्या काळात खाद्यतेल स्वस्त होणार असल्याने आमचे बजेट कोलमडणार नाही. सरकारने या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करून दुकानांमध्ये नवीन दरानेच विक्री होईल याकडे लक्ष द्यावे.

आता शॅम्पू, साबण, टूथपेस्टवरही दिसणार व्हेज-नॉनव्हेजचा ठिपका

पिंपरी: दैनिक संध्या

साबण, शॅम्पू, टूथपेस्ट आणि टॉयलेटरीज खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी पॅकेजिंगवरील रंगीत ठिपका महत्त्वाचा ठरणार आहे. शाकाहारी उत्पत्तीच्या उत्पादनांसाठी हिरवा, प्राणिज घटक उत्पादनांना लाल किंवा तपकिरी ठिपका पॅकेजच्या दर्शनी भागावर छापावा लागेल. केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार विभागाने २१ सप्टेंबरच्या अधिसूचनेद्वारे कायदेशीर मापनशास्त्र (पॅकेज्ड कमोडिटीज) नियम, २०११ मध्ये दुरुस्ती केली. नियम ६ मधील उपनियम ४(ए) मध्ये नवीन (डी) तरतूद समाविष्ट करण्यात आली. साबण, शॅम्पू, टूथपेस्ट, इतर सौंदर्यप्रसाधने आणि प्रसाधनांसाठी व्हेज-नॉन व्हेज उत्पत्ती दर्शविणारे ठिपके देण्याची तरतूद त्यात आहे. त्याचवेळी नियम ६ (८) वगळण्यात आला. खाद्यपदार्थांच्या पॅकेजिंगवर ग्राहकांना शाकाहारी किंवा मांसाहारी उत्पादन ओळखता यावे यासाठी रंगीत चिन्हांची पद्धत परिचित आहे. आता त्याच धर्तीवर वैयक्तिक वापराच्या काही उत्पादनांच्या पॅकेजिंगवरही घटकांची उत्पत्ती दर्शविण्याची सक्ती करण्यात आली आहे. मात्र ही तरतूद साबण, शॅम्पू, टूथपेस्ट, सौंदर्यप्रसाधने आणि टॉयलेटरीज या श्रेणीसाठी आहे. अधिसूचनेत या बदलामागील स्वतंत्र कारणमीमांसा सविस्तरपणे दिलेली नाही. मात्र या चिन्हामुळे उत्पादनातील घटकांची उत्पत्ती ग्राहकाला सहज ओळखता येणे आणि खरेदीचा निर्णय अधिक माहितीच्या आधारे घेता येणे हा या व्यवस्थेचा व्यवहार्य परिणाम आहे. विशेषतः धार्मिक, नैतिक किंवा वैयक्तिक पसंतीनुसार उत्पादन निवडणाऱ्या ग्राहकांना याचा उपयोग होऊ शकतो.

फ्लिपकार्टच्या बिग बिलियन डेजच्या १३ व्या पर्वाची ९ ऑक्टोबर पासून सुरुवात

■ मुंबई(दै. संध्या)

भारतातील स्वदेशी ई-कॉमर्स मार्केटप्लेस फ्लिपकार्टने आज 'द बिग बिलियन डेज २०२६' ची घोषणा केली असून, हा सेल ९ ऑक्टोबर रोजी त्याच्या १३ व्या पर्वाच्या रुपाने परत येत आहे. टीबीबीडी भारतातल्या सर्वात मोठ्या सणासूदीच्या निवडींपैकी एक असून यांत विक्रमी संख्येने विक्रेते सहभागी होणे, एआय-आधारित खरेदीचा अनुभव आणि फ्लिपकार्टचे आजपर्यंतचे सर्वात मोठे पुरवठा साखळी नेटवर्क असलेल्या ई कार्ट आणि फ्लिपकार्ट मिनीट्स च्या देशभरातील ८,२०० हून अधिकच्या फुलफिलमेंट सेंटर्स आणि वितरण शृंखलेचा लाभ एकत्रितपणे मिळणार आहे. प्लस, ब्लॅक आणि फ्लिपकार्ट क्रेडिट कार्ड सदस्यांसाठी अर्ली ॲक्सेस ८ ऑक्टोबरपासून सुरू होईल.

फ्लिपकार्ट ग्रुपचे सीईओ कल्याण कृष्णमूर्ती यांनी सांगितले " तेरा वर्षांपूर्वी भारतात डिजिटल कॉमर्स हे एक नाविन्य होते. आजमितीस, या पायाभूत सुविधा बनल्या आहेत. द बिग बिलियन डेज कदाचित या बदलाचे साक्षिदार बनलेल्या ५०० दशलक्षांहून अधिक नोंदणीकृत ग्राहक, १.४ दशलक्ष विक्रेते आणि देशाच्या लेह आणि कारगिल पर्यंत असलेल्या समाजापर्यंत पोहोचले असून जवळजवळ ७५,००० कर्मचारी हे फ्लिपकार्टच्या सणासूदीच्या दिवसांसाठी जोडले जाणाऱ्या लोकांसाठी आहे. यांत हा बदल झाला आहे की पर्वानुरुप या कथानकाचा एक मोठा भाग म्हणजे छोट्या शहरातील छोटे विक्रेते, टिअर ३ आणि टिअर ४ मधील लोकांना सुध्दा आता प्रिमियम उत्पादने उपलब्ध होऊ लागली आहेत. असे कर्मचारी ज्यांच्यासाठी सणासूदीचे दिवस अधिक चांगले असत. टीबीबीडी ही केवळ फ्लिपकार्टची कहाणी नाही तर ती आता भारताची कहाणी बनली आहे. भारत यासाठीच ठरला आणि फ्लिपकार्ट त्याचा एक भाग बनला आहे. लोकांच्या आवडी वाढल्याने प्रमाणही वाढू लागले आहे. आम्ही आता भारताला सेवा देत आहोत."

टीबीबीडी २०२६ मध्ये १५० दशलक्ष उत्पादने ही विविध विभागातून उपलब्ध होणार असून यामध्ये रोजच्या गरजेच्या वस्तूंपासून ते मोठे इलेक्ट्रॉनिक्स, प्रिमियम फॅशन, ब्यूटी, मोठी उपकरणे आणि सणासूदीच्या भेटवस्तूंचा समावेश आहे. या १३ व्या पर्वात सर्वात मोठे लाँचेस असतील जसे मोबाईल्स, मोठी उपकरणे, ब्युटी आणि पर्सनल केअर सह १२०० हून अधिक फॅशन ट्रेन्ड्स हा वर्ष भरातील सर्वात कमी किंमतीत उपलब्ध होणार आहेत. टीबीबीडी २०२६ मध्ये आजपर्यंतचा सर्वात मोठा विक्रेत्यांचा सहभाग असेल, यांमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत ६० टक्के अधिक उलाढाल होऊन ग्राहकांसाठी दुप्पट नवीन निवडीचे स्वातंत्र्य मिळणार आहे. सर्व प्रकारच्या फॅशन क्षेत्रात ० टक्के कमिशन सुविधा दिल्याने या पर्वा पूर्वी ७५ टक्के नवीन विक्रेत्यांनी यांत मोठा सहभाग नोंदवला आहे. सणासूदीला अधिक वेगाने आपल्या वस्तू लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने २.५ कोटींहून अधिक एमएसएमईज, छोटे विक्रेते, हस्तकलाकार आणि स्थानिक व्यवसायांनी उत्पादने दिली असून यामुळे त्यांची पोहोच ही संपूर्ण भारतातील ५०० दशलक्ष नोंदणीकृत ग्राहकांपर्यंत गेली आहे.

फ्लिपकार्ट मिनीट्स ची वार्षिक तुलनेत चौपट वाढ ही झाली आहे आणि आता जवळपास १,२०० मायक्रोफुलफिलमेंट सेंटर्स द्वारे १५० हून अधिक शहरे आणि ९,००० हून अधिक पिन कोडमध्ये कार्यरत आहे. या सणासुदीच्या हंगामात, मिनीट्स कडून १,४०० हून अधिक श्रेणींमध्ये ७७,००० हून अधिक उत्पादने उपलब्ध करून देईल, ज्यामध्ये दैनंदिन गरजेच्या वस्तू आणि शेतातून ताज्या आलेल्या उत्पादनांपासून प्रीमियम इलेक्ट्रॉनिक्स, फॅशन आणि शेवटच्या क्षणी दिल्या जाणाऱ्या भेटवस्तूंपर्यंतचा समावेश आहे, जी फ्लिपकार्ट ॲप सह स्वतंत्र ॲन्ड्रॉईड ॲप वर उपलब्ध असतील. पटणा, जयपूर, गुवाहटी, सिलिगुडी आणि सालेम यांसह टिअर २ प्लस शहरे प्रमुख वाढीची केंद्रे म्हणून उदयास येत आहेत, ज्यातून क्विक कॉमर्सचा विस्तार महानगरांच्या पलीकडे वेगाने होत असल्याचे हे द्योतक बनले आहे. ई कार्ट ने टीबीबीडी ची तयारी म्हणून १४ दशलक्ष घनफूट वेअरहाऊसिंग च्या जागेत वाढ केली असून साठवणूकीच्या क्षमते मध्ये ही ५० टक्क्यांची वाढ आहे, ऑटोमेशन वेगाने होत असल्याने प्रक्रिया क्षमतेतील वाढ ही ३० टक्क्यांहून अधिक आहे. फ्लिपकार्ट ने ७५० हून अधिक पिन कोड्स मध्ये ९०० हून अधिक नवीन डिलिव्हरी हब्स स्थापित केली असून यामध्ये लेह, कारगिल आणि ईशान्य भारतातील प्रदेशांचा समावेश केल्याने आता भारताच्या अधिकतर भागात त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी डिलिव्हरी करणे शक्य होणार आहे. या सणासूदीच्या दिवसात २.५ लाखांहून अधिक थेट आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार असून जवळजवळ ७५,००० कर्मचारी हे प्रथमच या फौजेत सामील होणार आहेत. फ्लिपकार्टच्या कर्मचाऱ्यांमध्ये २० टक्के महिलांचा समावेश आहे.

युवकांसाठी काहीच केले जात नाही असे चुकीचे चित्र देशात निर्माण केले जात आहे

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ; मएसो सीनिअर कॉलेजमध्ये गुणगौरव समारंभ



■ पुणे : : (दै. संध्या)

भारतामध्ये आज वेगळे वातावरण निर्माण केले जात आहे. युवकांसाठी काहीच केले जात नाही, देशात सर्व काही चुकीचे घडत आहे, असे चित्र युवकांसमोर आणले जात आहे. मात्र, तुम्ही विद्यार्थी या देशाचे भवितव्य आहात. भारत हा जगातील सर्वांत तरुण देश असून देश घडविण्यात युवकांची भूमिका महत्त्वाची आहे, असे मत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या एमएसो सीनिअर कॉलेजच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या शुभारंभ आणि गुणगौरव समारंभात ते बोलत होते. मयूर कॉलनीतील बाल शिक्षण मंदिरच्या एमईएस सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष प्रदीप नाईक होते. नियामक मंडळाच्या उपाध्यक्ष आनंदी पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रवींद्र वैद्य, उपप्राचार्या डॉ. पूनम रावत यावेळी उपस्थित होते.

मुरलीधर मोहोळ म्हणाले, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने माझ्यासारख्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांवर संस्कार केले आणि राष्ट्रभक्तीचे शिक्षण दिले. या संस्थेने एका सामान्य कुटुंबातून आलेल्या मला मूल्यांची शिकवण दिली.

ते पुढे म्हणाले, विद्येचे माहेरघर ही पुण्याची सगळ्यात मोठी ओळख आहे. आपल्यासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. देशातूनच नाही तर जगभरातून मुले येथे येऊन शिक्षण घेतात.

यासाठी अनेक शिक्षण संस्था पुण्यात आहेत. त्यापैकी एक मोठी संस्था म्हणजे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी आहे. संस्थेला १६५ वर्षांची परंपरा आहे. आताच्या काळाला आवश्यक आधुनिक कोर्सेस महाविद्यालयात सुरू आहेत, असे मोहोळ म्हणाले.

गेल्या काही दिवसांत विविध प्रकारची आंदोलने सुरू आहेत आणि अनेक विषयांवर चर्चा होत आहे. मात्र, आज जगातील अनेक देश भारताकडे विचार करणारा आणि नेतृत्व करणारा देश म्हणून पाहत आहेत. भारत हा जगातील सर्वांत तरुण देश आहे. त्यामुळे देशातील युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तुम्ही देशाचे भविष्य आहात, असेही त्यांनी सांगितले.

रवींद्र वैद्य म्हणाले, महाविद्यालयात पारंपरिक शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले कौशल्याधारित शिक्षणही दिले जाते.

उद्योगक्षेत्रात विद्यार्थ्यांना कोणत्या कौशल्यांची आवश्यकता आहे, याचा विचार करून त्यानुसार शिक्षण दिले जाते.

फेकलेल्या जीन्सपासून नव्या उपजीविकेपर्यंत

■ पुणे : (दै. संध्या)

फेकून दिलेल्या जीन्स आणि कापडाच्या तुकड्यांपासून उपयुक्त जीवनशैली उत्पादने तयार करत, त्यातून महिला कारागिरांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचा अभिनव प्रयत्न महाराष्ट्रातील २१ वर्षीय योगीता किशोर हिने सुरू केला आहे. तिच्या 'इंडीजीनीअस' या उपक्रमातून डेनिम कचऱ्याला नवसंजीवनी देण्याबरोबरच सामाजिक आणि पर्यावरणीय प्रश्नांवर तोडगा शोधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

गेल्या दीड वर्षापासून योगीता डेनिम कचऱ्याचे पुनर्वापर करण्याच्या संकल्पनेवर काम करत आहे. तिच्या या उपक्रमाची सॅमसंग सॉल्व्ह फॉर टुमॉरो २०२६च्या सर्वोच्च २० संघांमध्ये निवड झाली आहे. या निवडीमुळे तिच्या कल्पनेला व्यापक व्यासपीठ मिळाले असून, सध्या ती विविध नमुने विकसित करण्याबरोबरच या संकल्पनेचे मोठ्या प्रमाणावर रूपांतर कसे करता येईल, यावर काम करत आहे.

"सॅमसंग सॉल्व्ह फॉर टुमॉरोचा भाग असल्याबद्दल मी कृतज्ञ आहे. मिळणारा अभिप्राय आणि मार्गदर्शन खूप महत्त्वाचे आहे. तरुणांमधील बदल घडविण्याची क्षमता ओळखून त्यांना व्यासपीठ देणारा हा उत्तम उपक्रम आहे," असे योगीता सांगते. कार्यक्रमाच्या प्रशिक्षण शिबिरात सहभागी होण्यापूर्वी योगीताचे लक्ष प्रामुख्याने फेकून दिलेल्या कापडाला नव्याने उपयोगात आणण्यावर होते. मात्र मार्गदर्शक, तज्ज्ञ आणि देशभरातील इतर तरुण नवोन्मेषकांशी झालेल्या चर्चेमुळे तिच्या विचारांना नवी दिशा मिळाली.

कापड कचऱ्याचा संपूर्ण प्रवास, त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम तसेच तयार होणाऱ्या उत्पादनाचा प्रत्यक्ष वापर कोण करणार, याचा अधिक सखोल विचार तिने सुरू केला. "माझ्या कल्पनेत मोठा बदल झाला आहे. सुरुवातीला आमचा भर केवळ पुनर्वापरावर होता. आता हा कचरा अधिक प्रभावीपणे कसा वापरता येईल, याचा आम्ही विचार करत आहोत.

नादुरुस्त रोहित्रांची माहिती एका क्लिकवर देता येणार

■ मुंबई: (दै. संध्या)



राज्यातील प्रामुख्याने शेतकरी आणि सर्वसामान्य वीजग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा मिळावा यासाठी महावितरणने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. कोणत्याही भागातील नादुरुस्त किंवा बंद पडलेल्या रोहित्राची (ट्रान्सफॉर्मर) माहिती थेट 'महावितरण मोबाईल ॲप'द्वारे एका क्लिकवर देण्याची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे नादुरुस्त रोहित्र ताबडतोब बदलणे किंवा दुरुस्त करणे लवकर शक्य होणार आहे. या ॲपद्वारे कोणालाही कोणत्याही ठिकाणच्या नादुरुस्त रोहित्राची माहिती देता येईल, हे विशेष. यासह महावितरणच्या www.mahadiscom.in वेबसाईटवर किंवा कॉल सेंटरमध्ये देखील तक्रार नोंदविण्याची सोय उपलब्ध आहे. महावितरणने नादुरुस्त रोहित्र बदलण्यासाठी राज्यभरात यंत्रणा सज्ज ठेवली आहे. तथापि, नादुरुस्त किंवा बंद पडलेल्या रोहित्राची माहिती प्राप्त होण्यास विलंब होत असल्याचे दिसून आले. त्याची गंभीर नोंद घेत मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी नादुरुस्त रोहित्रांची माहिती कळविण्यासाठी नागरिकांना 'महावितरण मोबाईल ॲप'द्वारे खास सोय उपलब्ध करून देण्याची सूचना केली. त्याप्रमाणे ही सुविधा ॲपवर कार्यान्वित झाली आहे.

■ बाजारातील बदलांशी जुळवून घेणाऱ्या संतुलित गुंतवणूक दृष्टिकोनावर भर

बंधन फ्लेक्सी कॅप फंडाची २१ वर्षांची वाटचाल

■ पुणे : (दै. संध्या)

बंधन फ्लेक्सी कॅप फंडाने २१ वर्षांचा महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण केला आहे. या निमित्ताने फंडाच्या गुंतवणूक तत्त्वज्ञानाचा आणि बदलत्या बाजारचक्रांशी जुळवून घेण्यासाठी स्वीकारलेल्या संतुलित दृष्टिकोनाचा आढावा घेण्यात आला. बाजारातील नेतृत्व सातत्याने बदलत असताना कोणत्याही एका गुंतवणूक शैलीवर अवलंबून न राहता विविधीकरण, संतुलन आणि अनुकूलनक्षमतेवर भर देणे हा या फंडाच्या दृष्टिकोनाचा केंद्रबिंदू आहे.

इक्विटी बाजारात कोणतीही एक गुंतवणूक पद्धत प्रत्येक बाजारचक्रात सातत्याने सर्वोत्तम कामगिरी करेलच असे नाही. काही काळात वेगवान वाढ असलेल्या समभागांना पसंती मिळते, तर अन्य काळात मूल्याधारित, गुणवत्तापूर्ण किंवा कमी अस्थिरतेच्या समभागांना चांगली कामगिरी करण्याची संधी मिळते. त्यामुळे पुढील काळात कोणती गुंतवणूक शैली आघाडीवर राहील, याचा अचूक अंदाज बांधणे कठीण असते.

ही बाब लक्षात घेऊन बंधन फ्लेक्सी कॅप फंडाने कोणत्याही एका बाजारप्रवाहावर अवलंबून न राहता संतुलित गुंतवणूक चौकट स्वीकारली आहे. फंडाच्या गुंतवणूक तत्त्वज्ञानात वेगवान वाढ, गुणवत्तापूर्ण व्यवसाय आणि मूल्याधारित गुंतवणूक या तीन प्रमुख दृष्टिकोनांना महत्त्व दिले जाते.

कोटक सिक्युरिटीजने रिटेल व्यवसायाचे नाव बदलून केले 'कोटक निओ'

■ मुंबई(दै. संध्या)

कोटक सिक्युरिटीज लिमिटेडने आज आपल्या ग्राहकांसाठीच्या ब्रँड ओळखीचे नाव बदलून 'कोटक निओ' करत असल्याचे जाहीर केले. याद्वारे एक एकीकृत आणि भविष्यासाठी सज्ज असलेली गुंतवणूक व्यवस्था तयार करण्यात आली आहे. आजच्या काळात ग्राहक ज्या प्रकारे आर्थिक बाजारात सहभागी होतात, त्या पद्धतीत झालेला मूलभूत बदल 'कोटक निओ'मधून दिसून येतो. आजच्या ग्राहकांना अधिक पर्याय, विनाअडथळा डिजिटल अनुभव आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन एकाच ठिकाणी हवे आहे. भारतातील गुंतवणूकदार आणि ट्रेडर्सच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी कोटक सिक्युरिटीजने नवीन तंत्रज्ञान, उत्पादन नवकल्पना, संशोधन आणि ग्राहक अनुभवामध्ये केलेल्या मोठ्या गुंतवणुकीनंतर हा बदल करण्यात आला आहे. या निर्णयामुळे डिजिटल क्षमता, संशोधन क्षेत्रातील प्राविण्य आणि रिलेशनशिप-आधारित सुविधा एकत्र येऊन हा संपूर्ण व्यवसाय एकाच ब्रँड ओळखीखाली आला आहे.

या लाँच प्रसंगी बोलताना कोटक निओचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीपाल शाह म्हणाले, "गुंतवणूकदारांच्या गरजा सतत बदलत आहेत. आज ते फक्त शेअर्स, म्युच्युअल फंड किंवा डेरिव्हेटिव्ह्ज यांसारख्या वैयक्तिक उत्पादनांचा विचार करत नाहीत, तर संपत्ती कशी निर्माण करायची, पोर्टफोलिओमध्ये विविधता कशी आणायची आणि अर्थव्यवस्थेतील विविध संधींमध्ये कसे सहभागी व्हायचे, या संपूर्ण चित्राचा विचार करत आहेत. परंतु या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक प्लॅटफॉर्म्स, पुरवठादार आणि सल्लागारांशी संपर्क साधावा लागतो. 'कोटक निओ'च्या माध्यमातून हा सर्व प्रवास एकाच इकोसिस्टममध्ये एकत्र आणणे हे आमचे उद्दिष्ट आहे."

डिजिटल सोयीसोबतच मानवी प्राविण्याची जोड हे 'कोटक निओ'चे प्रमुख वैशिष्ट्य आहे. या डिजिटल-फर्स्ट प्लॅटफॉर्मला कोटकच्या देशभरातील शाखा, पार्टनर नेटवर्क, संशोधन क्षमता आणि रिलेशनशिप मॅनेजर्सची साथ लाभली आहे. त्यामुळे ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार तंत्रज्ञान किंवा थेट मानवी मार्गदर्शनाचा वापर करण्याचे स्वातंत्र्य मिळते. या बदलाचा एक भाग म्हणून, कोटक निओ 'कोटक निओ प्रायव्हेट क्लायंट ग्रुप' आणि 'कनेक्ट प्लस बाय कोटक निओ' च्या माध्यमातून आपल्या वेल्थ मॅनेजमेंटचा विस्तार करत असून, यामुळे अनुक्रमे गुंतवणूकदार आणि वितरकांना मोठा फायदा होणार आहे. 'कोटक निओ प्रायव्हेट क्लायंट ग्रुप' ओपन-आर्किटेक्चर सोल्यूशन्स आणि ग्रूपची उत्पादन क्षमता व संस्थात्मक दर्जाच्या संशोधन क्षमतेचा वापर करून व्यक्ती व कुटुंबांना आयुष्याच्या विविध टप्प्यांवर संपत्ती निर्माण करण्यास, त्याचे व्यवस्थापन करण्यास आणि ती जतन करण्यास मदत करतो. तसेच, 'कोटक निओ कनेक्ट प्लस' वितरकांना म्युच्युअल फंड, इक्विटी ब्रोकिंग, इन्शुरन्स, पीएमएस, एआयएफ ऑफरिंग्स यांसारख्या वेल्थ मॅनेजमेंट उत्पादनांची सर्वसमावेशक श्रेणी उपलब्ध करून देऊन सक्षम करते. डिझाइन, तंत्रज्ञान आणि उत्पादन विकासातील नवनिर्मितीच्या जोरावर, कंपनी अल्गोरिदमिक ट्रेडिंग, स्ट्रॅटेजी टूल्स, थीम-आधारित स्टॉक बास्केट्स, एमएफ पोर्टफोलिओ ॲनालायझर आणि कोटकचे संशोधन समजून घेण्यासाठी 'निओमी' हे एआय आधारित असिस्टंट यांसारख्या प्रगत सुविधा प्रदान करते. कोटकच्या विस्तृत इकोसिस्टमशी जोडले गेल्यामुळे ग्राहकांना आता एकाच ठिकाणी बँकिंग, गुंतवणूक आणि वेल्थ-मॅनेजमेंट सोल्यूशन्सचा लाभ घेता येईल.

'कोटक निओ' हा ब्रँड कोटक सिक्युरिटीज लिमिटेडच्या रिटेल व्यवसायाचे प्रतिनिधित्व करतो. 'कोटक सिक्युरिटीज लिमिटेड' हीच कायदेशीर संस्था राहील आणि विद्यमान ग्राहक खाती, उत्पादने, सेवा किंवा प्रशासकीय चौकटीत कोणताही बदल होणार नाही.

सोमेश्वर कारखाना शेतकऱ्यांच्या हिताचा ठेवायचा की नुकसान करणारा

निर्णय सभासदांनी घ्यावा

- नाझरे सुपे येथे लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनलचा प्रचार
- चेअरमन पुरुषोत्तम जगताप यांचे सभासदांना आवाहन



■ नाझरे सुपे पुरंदर (दै. संध्या)

सोमेश्वर सहकारी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचा आणि फायद्यात चालणारा कारखाना म्हणून पुढेही टिकवायचा असेल, तर सभासदांनी योग्य निर्णय घेणे गरजेचे आहे. कारखाना पुन्हा तोट्यात जाऊन इतर कारखान्यांप्रमाणे आजारी पडू नये, यासाठी शेतकऱ्यांनी लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनलच्या उमेदवारांना मतदान करावे, असे आवाहन सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पुरुषोत्तमदादा जगताप यांनी केले. सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनलच्या प्रचारासाठी पुरंदर तालुक्यातील नाझरे सुपे येथे सभासदांची सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी कारखान्याच्या कामकाजाबाबत तसेच शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध विषयांवर उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले. यावेळी पुरंदर-हवेलीचे माजी आमदार संजय चंदुकाका जगताप, सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पुरुषोत्तमदादा जगताप, ज्येष्ठ नेते सुदामआप्पा इंगळे, जिल्हा परिषद सदस्य हरिभाऊ लोळे, अजय इंगळे, तसेच पॅनलचे उमेदवार अरविंद शेंडकर, वंदना संभाजी गरुड यांच्यासह सभासद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना चेअरमन पुरुषोत्तमदादा जगताप म्हणाले, "मा. अजितदादांच्या नेतृत्वाखाली सोमेश्वर सहकारी साखर कारखाना तोट्यातून फायद्यात आणण्यात आला आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न आणि कारखान्याची प्रगती अशीच कायम ठेवायची असेल, तर सभासदांनी आमच्या पॅनलच्या उमेदवारांना साथ द्यावी. अन्यथा कारखाना पुन्हा इतर कारखान्यांप्रमाणे आजारी पडण्याची शक्यता आहे."

माजी आमदार संजय चंदुकाका जगताप यांनी सांगितले की, पुरुषोत्तमदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचा कारभार चांगल्या पद्धतीने आणि फायद्यात सुरू आहे. शेतकऱ्यांची बिले व देणी व्यवस्थितपणे देण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा कारभार पुढेही सुरळीत सुरू राहावा आणि शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले जावेत, यासाठी लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनलच्या उमेदवारांना विजयी करावे.

ज्येष्ठ नेते सुदामआप्पा इंगळे म्हणाले की, "हा पॅनल कोणत्याही राजकीय पक्षाचा नसून शेतकऱ्यांचा पॅनल आहे. शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळावे, कारखाना सक्षमपणे चालावा आणि सभासदांच्या हिताचे निर्णय घेतले जावेत, यासाठी पॅनलच्या उमेदवारांना चांगले मतदान करावे," असे आवाहन त्यांनी केले. या प्रचारसभेला सरपंच भाऊसो कापरे, संचालक शांताराम कापरे, विनायक तात्या कापरे, अर्जुनदादा कापरे, संभाजीतात्या कापरे, तसेच गावातील ग्रामस्थ व सोमेश्वर कारखान्याचे सभासद उपस्थित होते.

पंचायत समितीच्या माजी सदस्या सुनिताकाकी कोलते, माजी सरपंच मनिषा नाझीरकर यांचीही उपस्थिती होती. सभेच्या शेवटी पॅनलच्या उमेदवारांनी उपस्थित सभासद व ग्रामस्थांचे आभार मानले. आगामी निवडणुकीत शेतकरी हित, कारखान्याची आर्थिक स्थिरता आणि भविष्यातील प्रगती या मुद्द्यांवर सभासदांनी विचारपूर्वक मतदान करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

थोडक्यात पण महत्वाचे



महादेव मंदिर परिसरातील विहिरीचे पाणी ग्रामस्थांसाठी तात्काळ उपलब्ध करून द्यावे

कवठे येमाई : दैनिक संध्या

शिरूरच्या पश्चिमेकडील कवठे येमाई गावठाणातील सध्याची पाणीटंचाई, जाणवणाऱ्या दुष्काळाच्या झळा व वाढत्या उकाड्याच्या पार्श्वभूमीवर महादेव मंदिर परिसरातील विहिरीतील पाणी ग्रामस्थांना तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने उपाययोजना करावी,अशी मागणी ग्रामस्थांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे केली आहे.या बाबतचे ग्रामस्थांच्या सह्यांचे निवेदन आज माजी ग्रामपंचायत सदस्य मिठूलाल बाफना,डॉ.विकास शेटे,मिलिंद काळे यांनी ग्रामपंचायत प्रशासनास दिले. ग्रामस्थांच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, यापूर्वीही यासंदर्भात अर्ज देऊन पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याने पुन्हा एकदा प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. महादेव मंदिर परिसरातील विहिरीवर ३ एचपीची मोटार बसवून तेथेच किमान १० ते १५ हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी उभारावी, तसेच पाइपलाइनद्वारे पेठकऱ्याना पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. सध्या परिसरातील नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, जनावरांसाठीही पाणी उपलब्ध होणे गरजेचे आहे. विहिरीतील पाण्याचा योग्य पद्धतीने उपसा करून नियमित पाणीपुरवठा केल्यास ग्रामस्थांसह जनावरांचीही पाण्याची समस्या काही प्रमाणात दूर होऊ शकते. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन आवश्यक मोटार, टाकी व पाइपलाइनची व्यवस्था करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने विलंब न करता उपाययोजना करावी, अन्यथा ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागू शकतो, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.हे निवेदन ग्रामपंचायत कर्मचारी विकास उघडे व अजित शिंदे यांनी स्वीकारले.

घराघरांत स्वच्छतेची लगबग कपडे धुण्यापासून देवघर सजावटीपर्यंत उत्साह

कोरेगावमुळ : दैनिक संध्या

नवरात्रोत्सवाला सुरुवात होण्याच्या पार्श्वभूमीवर घराघरांत स्वच्छतेची लगबग सुरु झाली आहे. नवरात्राच्या काळात घर आणि परिसर स्वच्छ ठेवण्याची परंपरा आजही अनेक कुटुंबांमध्ये जपली जात असून, कपडे धुणे, घराची साफसफाई करणे, देवघर स्वच्छ करुन सजविणे यासाठी महिलांसह कुटुंबातील सदस्यांची धावपळ सुरु झाली आहे. नवरात्र हा केवळ धार्मिक उत्सव नसून, भारतीय संस्कृती, परंपरा आणि श्रद्धेचा संगम मानला जातो. देवीच्या आगमनापूर्वी घराची स्वच्छता करुन वातावरण पवित्र व प्रसन्न ठेवण्याची प्रथा अनेक वर्षांपासून रुढ आहे. त्यामुळे नवरात्राच्या काही दिवस आधीच घरातील कपडे धुणे, पडदे व चादरी स्वच्छ करणे, अंगणाची स्वच्छता करणे तसेच देवघराची विशेष साफसफाई करण्याला प्राधान्य दिले जाते. पूर्वी नदी, विहीर तसेच सार्वजनिक पाणवठ्यांवर कपडे धुण्यासाठी महिलांची मोठी लगबग पाहायला मिळत असे. या निमित्ताने महिलांच्या गप्पा, घरगुती कामांची चर्चा आणि सणाच्या तयारीचा उत्साह यामुळे परिसरात वेगळेच चैतन्य निर्माण होत असे. आधुनिक काळात वॉशिंग मशीन आणि इतर सुविधांमुळे कपडे धुण्याची पद्धत बदलली असली, तरी सणापूर्वी स्वच्छता करण्याची संस्कृती आणि परंपरा मात्र आजही कायम आहे. नवरात्राच्या काळात स्वच्छता, सात्त्विकता आणि भक्तिभावाला विशेष महत्त्व दिले जाते. त्यामुळे घर स्वच्छ करुन देवीच्या स्वागताची तयारी करणे ही अनेकांसाठी श्रद्धेची बाब आहे. बदलत्या जीवनशैलीतही अशा परंपरांमधून पुढील पिढीला संस्कृतीची ओळख करुन देण्याचे काम होत आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने घराघरांत सुरु झालेली ही स्वच्छतेची लगबग आणि सणाच्या तयारीतील उत्साह ग्रामीण संस्कृतीतील साधेपणा, आपुलकी आणि परंपरेशी असलेले नाते अधोरेखित करत आहे.

तुकाराम मुटके यांचे निधन



चाकण : दैनिक संध्या

चाकण येथील जुन्या पिढीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व प्रगतशील शेतकरी तुकाराम नारायण मुटके (वय - ९८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, चार मुली, सुना, नातवंडे, पतवंडे, जावई असा मोठा परिवार आहे. चाकण लायन्स क्लब चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष प्रकाश मुटके व खेड तालुका खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष नवनाथ मुटके यांचे ते वडील होत. तर येथील नगरसेवक धीरज मुटके व उद्योजक अभिषेक मुटके यांचे ते आजोबा होत.

‘गेरोसा निवास’मध्ये माणुसकीचा सोहळा

कायदेविषयक प्रबोधनासह वृद्धाश्रमात साजरी झाली महात्मा गांधी जयंती



■ नारायणगाव (दै. संध्या)

जीवनाच्या संध्याकाळी आपुलकीच्या आणि कायदेशीर संरक्षणाच्या उबदार स्पर्शाची गरज असणाऱ्या ज्येष्ठांसाठी ‘गेरोसा निवास : दुलसीने पिस होम फॉर द एज्ड’, वाकी बु. येथे एक अनोखा आणि भावस्पर्शी कार्यक्रम पार पडला. तालुका विधी सेवा समिती खेड, वकील संघटना खेड-राजगुरुनगर आणि हुतात्मा राजगुरु शिक्षण प्रसारक मंडळाचे (HRSPM) सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने, मा. मुख्य मध्यस्थी केंद्र, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार या विशेष कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रबोधनपर्वाच्या अध्यक्षस्थानी खेड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) एम. टी. खरडे साहेब उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वकील संघटना खेडचे अध्यक्ष ॲड.अतुल गोराडे यांनी अत्यंत मोजक्या अन् अर्थपूर्ण शब्दांत केले.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना ॲड. कावेरी गुंजाळ यांनी 'पालक व ज्येष्ठ नागरिकांचे संगोपन व कल्याण कायदा, २००७' या विषयावर अत्यंत रसाळ आणि संवेदनशील शैलीत प्रकाश टाकला. ज्येष्ठांचे हक्क, त्यांचे कायदेशीर संरक्षण आणि समाजाचे त्यांच्याप्रती असणारे कर्तव्य यावर भाष्य करत त्यांनी उपस्थितांच्या मनात कायदेशीर जागरूकतेची ज्योत प्रज्वलित केली. "ज्येष्ठ नागरिकांचे हक्क व सन्मान जपणे हे समाजाचे आद्य कर्तव्य असून कायदा सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे," असे प्रतिपादन न्यायाधीश एम. टी. खरडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले.

कायद्याच्या ज्ञानासोबतच स्नेहाचा ओलावा जपत, सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने याच वेळी महात्मा गांधी जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांचे स्मरण करत, सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) एम. टी. खरडे साहेब व विद्यार्थ्यांच्या हस्ते वृद्धाश्रमातील वयोवृद्धांना प्रेमाची साद म्हणून ताजी फळे वाटण्यात आली. या उपक्रमामुळे वृद्धाश्रमातील आजी - आजोबांच्या चेहऱ्यावर एक तृप्त आणि आनंदी हास्य फुलले. समाजाभिमुखतेचा ध्यास घेतलेला हा संपूर्ण उपक्रम हुतात्मा राजगुरु शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा मा.आमदार दिलीपराव मोहिते पाटील, संस्थेचे सचिव - प्राचार्य डॉ. शिवाजीराव मोहिते, खजिनदार सौ. सुरेखाताई डी. मोहिते पाटील तसेच विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण शिंदे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. या स्नेहसोहळ्याला वकील संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. अमोल धुमाळकर, उपाध्यक्ष ॲड. अजिंक्य वाफगावकर, सचिव ॲड. माणिक बाचाळ, सचिव ॲड. दिपाली नाइकरे/होनराव, खजिनदार ॲड. प्रियंका टाकळकर, लोकल ऑडिटर ॲड. किरण कांबळे, सदस्य ॲड. सुचिता भागवत, ॲड. संदीप करंजखेले, ॲड. सुदीप परदेशी आणि ॲड. ऋषिकेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

कृषी कन्यांकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन



■ जेजुरी (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील धालेवाडी येथे पुणे कृषी महाविद्यालयाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत आयोजित शिबिरात शेतकऱ्यांना विविध आधुनिक कृषी तंत्रज्ञान पिके व्यवस्थापन याविषयावर कृषी कन्यांनी मार्गदर्शन केले. पुरंदर तालुक्यातील धालेवाडी येथे आयोजित या कार्यक्रमास डॉ. विकास भालेराव, (सहायक प्राध्यापक, वनस्पती रोगशास्त्र विभाग) व डॉ. श्रद्धा बगाडे,(सहयोगी प्राध्यापक, कृषि हवामानशास्त्र विभाग) तसेच डॉ. स्वाती खांदवे (सहायक प्राध्यापक, मृदशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय), डॉ. दिप्ती वाघधरे, (सहायक प्राध्यापक, मृदशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, पुणे) व डॉ. पल्लवी सुर्यवंशी, (सहायक प्राध्यापक कृषीविस्तार)यांनी शेतकऱ्यांना आधुनिक शेती,पिके व्यवस्थापन आदी विषयांवर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास गावातील प्रगतशील शेतकरी मुरलीधर कळाणे, हनुमंत कळाणे, सौ. सीमा कळाणे, सौ. प्रियांका कळाणे यांच्यासह गावातील इतर प्रगतिशील शेतकरी तसेच महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

उपस्थित शेतकरी बांधवांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत कृषीविषयक मार्गदर्शनाचा लाभ घेतला. सामाजिक कार्यकर्ते हनुमंत काळाणे यांनी गावातील कृषी क्षेत्राची विशेष प्रशंसा करत डाळिंब, पेरू, सीताफळ तसेच शेवंती, झेंडू, गुलाब यांसारख्या विविध फुलपिकांच्या यशस्वी उत्पादनाचा उल्लेख केला. कार्यक्रमाचे आयोजन कृषिकन्या, धालेवाडी. तसेच पिंपळे आणि हिवरे येथील कृषिकन्या यांनी केले.

डॉ. वर्धमान कांकरिया यांची जगातील टॉप ५० नेत्रतज्ज्ञांमध्ये निवड

■ पुणे (दै. संध्या)

पुणे शहरासाठी तसेच भारतीय नेत्ररोगतज्ज्ञ क्षेत्रासाठी अभिमानाची बाब म्हणजे, ख्यातनाम नेत्रतज्ज्ञ डॉ. वर्धमान कांकरिया यांची अमेरिकेतील प्रतिष्ठित एक्सपर्टस्केप यूएसए या जागतिक संस्थेकडून जगातील सर्वोत्तम ५० नेत्रतज्ज्ञांमध्ये निवड करण्यात आली आहे.

एक्सपर्टस्केप ही संस्था वैद्यकीय क्षेत्रातील संशोधन, वैज्ञानिक प्रकाशने, शैक्षणिक प्रभाव आणि जागतिक वैद्यकीय प्रगतीतील योगदान यांच्या आधारे जगभरातील तज्ज्ञ डॉक्टरांची क्रमवारी निश्चित करणारी आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त संस्था आहे.

पुण्यातील एशियन आय हॉस्पिटलचे संचालक डॉ. वर्धमान कांकरिया यांना २०१० पासून मोतीबिंदू आणि नंबर कमी करण्याच्या शस्त्रक्रिया (Refractive Surgery) क्षेत्रातील उल्लेखनीय आंतरराष्ट्रीय योगदानासाठी हा सन्मान मिळाला आहे. लॅसिक (LASIK), रोबोटिक मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि अत्याधुनिक दृष्टी सुधारणा शस्त्रक्रियांमध्ये ते भारतातील अग्रगण्य नेत्रतज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. या प्रतिष्ठित यादीमध्ये एआयआयएमएस (AIIMS) दिल्लीच्या प्रा. डॉ. नम्रता शर्मा तसेच बंगळुरूचे डॉ. रोहित शेट्टी यांचाही समावेश आहे.



डॉ. कांकरिया यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक मानाचे पुरस्कार आणि गौरव प्राप्त केले आहेत. भारतात सर्वाधिक लॅसिक (LASIK) शस्त्रक्रिया करणाऱ्या नेत्रतज्ज्ञांपैकी एक म्हणून त्यांची लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये नोंद आहे. तसेच मायनस ३० नंबरसारख्या अत्यंत जास्त चष्मा नंबरवर अत्याधुनिक शस्त्रक्रियेद्वारे यशस्वी उपचार केल्याबद्दलही त्यांना विशेष ओळख मिळाली आहे. भारतामध्ये रोबोटिक अचूकतेच्या फेम्टोसेकंद लेझर-सहाय्यित मोतीबिंदू शस्त्रक्रिया (Femtosecond Laser Assisted Cataract Surgery) या तंत्रज्ञानाचे ते अग्रणी तज्ज्ञ मानले जातात. जागतिक दर्जाचे अनेक आधुनिक नेत्रतंत्रज्ञान पुणे आणि भारतात उपलब्ध करून देण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. या सन्मानाबद्दल प्रतिक्रिया देताना डॉ. कांकरिया यांनी सांगितले की, "हा सन्मान केवळ माझा नसून एशियन आय हॉस्पिटलच्या संपूर्ण टीमचा, माझ्या गुरूंचा, रुग्णांचा आणि पुणे शहराचा आहे. हा गौरव भविष्यात अधिक उत्कृष्ट नेत्रसेवा, संशोधन, नवकल्पना आणि जागतिक दर्जाची शस्त्रक्रिया करण्यासाठी प्रेरणा देणारा ठरेल." या यशामुळे पुण्याच्या वैद्यकीय क्षेत्रात अभिमानाची भावना निर्माण झाली असून, प्रगत आरोग्यसेवा आणि नेत्रचिकित्सा उत्कृष्टतेचे केंद्र म्हणून शहराची वाढती प्रतिष्ठा अधिक बळकट झाली आहे.

सहा रायडर्सनी जवळून अनुभवले केटीएमचे मोटोजीपी पॅडॉक

■ पुणे (दै. संध्या)

प्रो कॅटेगरीमध्ये पहिल्या आणि दुसऱ्या स्थानावर राहिलेले योहान इमॅन्युएल आणि मोहम्मद मिकाइल, अमेचर कॅटेगरीमधील टॉप दोन रायडर्स कार्तिक आर आणि जोबिन खारमलकी तसेच विमेन्स कॅटेगरीमध्ये पहिल्या आणि दुसऱ्या स्थानावर राहिलेल्या लानी झेना फर्नांडिस आणि सायमाह एजाज बेग यांनी ऑस्ट्रियाचा दौरा केला. कोईम्बतूरमधील कारी मोटर स्पीडवे येथे केटीएम कप सीझन ३ ची सांगता झाल्यानंतर या सहा रायडर्सना ऑस्ट्रियाला जाण्याची संधी मिळाली.

ऑस्ट्रियामध्ये त्यांना रेसिंगची एक वेगळी बाजू अनुभवता आली. केटीएम रेसिंग फॅक्टरी आणि केटीएम मोटोहॉल येथे रेसिंगच्या पडद्यामागे चालणारे काम त्यांनी जवळून पाहिले. त्याचबरोबर मोटोजीपी वीकेंडसाठी केली जाणारी तयारी, त्यासाठी आवश्यक असलेला संवाद आणि टीमवर्क यांचाही त्यांना अनुभव घेता आला.

योहान इमॅन्युएलसाठी केटीएम रेसिंग फॅक्टरीची भेट म्हणजे रेसिंग सीझनमध्ये ट्रॅकपासून दूर पडद्यामागे होणाऱ्या विविध कामांची माहिती घेण्याची संधी होती. त्याला केटीएमचा डकारमधील वारसाही



जवळून जाणून घेता आला. "ऑस्ट्रियाचा दौरा हा एक अविस्मरणीय अनुभव होता. केटीएम रेसिंग फॅक्टरी मध्ये रेसिंग सीझनदरम्यान पडद्यामागे किती काम केले जाते, याबद्दल मला खूप काही शिकायला मिळाले. डकारमधील केटीएम चा इतिहास आणि सलग २० वर्षे विजय मिळवण्याची त्यांची कामगिरी पाहून मी खरोखरच प्रभावित झालो.", असे योहान म्हणाला. रेड बुल रिंग येथे या सहा रायडर्सनी ऑस्ट्रियन ग्रां प्रिचा वीकेंड केटीएम फॅक्टरी टीमच्या मोटोजीपी पॅडॉकमध्ये घालवला. रेससाठी केली जाणारी तयारी त्यांनी जवळून पाहिली आणि रेसिंगच्या पडद्यामागे काम करणाऱ्या टीममधील लोकांना भेटले. त्यांनी पेड्रो अकोस्टाची भेट घेऊन त्याच्याशी संवादही साधला. हे सहाही रायडर्स ज्या स्तरावर पोहोचण्याचे स्वप्न पाहत आहेत, त्या स्तरावर पेड्रो स्पर्धा करत आहे.

केटीएमच्या होम ग्रां प्रिमध्ये पेड्रो अकोस्टाने रेड बुल केटीएम फॅक्टरी रेसिंगसाठी आपला पहिला मोटोजीपी विजय मिळवला. या सहा रायडर्सनी फॅक्टरी टीमसोबत राहून हा विजय प्रत्यक्ष पाहिला आणि पोडियम वरील सेलिब्रेशनमध्येही ते सहभागी झाले. या अनुभवाबद्दल योहान म्हणाला, "केटीएम फॅक्टरी रेसिंगच्या मोटोजीपी पॅडॉकमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहणे, पेड्रो अकोस्टाचा पहिला विजय पाहणे आणि पोडियमवरील सेलिब्रेशन अनुभवणे हे सगळेच अविश्वसनीय होते. मी जितका जास्त वेळ तिथे होतो, तितकीच स्वतः त्या स्तरावर पोहोचण्याची माझी इच्छा अधिक तीव्र होत गेली."

सायमाह एजाज म्हणाले की "हा अनुभव माझ्यासाठी खूपच खास होता. पेड्रो अकोस्टाला त्याचा पहिला मोटोजीपी विजय मिळवताना पाहणे, पोडियम सोहळा अगदी जवळून अनुभवणे, रायडर्सना भेटणे आणि केटीएम फॅक्टरी पॅडॉकचा आतून अनुभव घेणे या सगळ्याच गोष्टी माझ्यासाठी खास होत्या. इथला स्तर वेगळा होता, पण त्यामागची भावना मात्र ओळखीची होती."

जोबिन खारमलकीसाठी केटीएम फॅक्टरी टीमसोबत राहून मोटोजीपी अनुभवण्याची ही अशा प्रकारची पहिलीच संधी होती. तो म्हणाला, "मी पहिल्यांदाच मोटोजीपी रेस प्रत्यक्ष पाहिली. रायडर्सना भेटलो, त्यांच्या पिट बॉक्सला भेट दिली आणि पोडियमच्या ठिकाणी केटीएम फॅक्टरी टीमसोबत विजयाचा आनंदही साजरा केला. हे सगळे माझ्या कल्पनेपलीकडचे होते. आयुष्यात एकदाच मिळणारा हा अनुभव होता."

या सहा रायडर्सना ऑस्ट्रियाच्या दौऱ्यामुळे केटीएम कप मधील रेसिंगच्या अनुभवापलीकडे जाऊन केटीएम च्या व्यापक रेसिंग विश्वाचा अनुभव घेता आला. मोटोजीपी वीकेंडमागील तयारी, टीमवर्क आणि शिस्त यांचा अनुभव त्यांना प्रत्यक्ष घेता आला. आता केटीएम कप सीझन ४ सुरू झाला असून 30 हून अधिक शहरांमध्ये सिटी रेस आयोजित करण्यात येत आहेत. त्यामुळे रायडर्सच्या पुढील गटाला रेसिंग ग्रिडवर स्वतःचा प्रवास सुरू करण्याची संधी मिळत आहे.

लानी झेना फर्नांडिस म्हणाले की "आपण रेसिंग का करतो, सतत पुढे जाण्यासाठी प्रयत्न का करतो आणि आपल्या स्वप्नाचा पाठलाग करणे का महत्त्वाचे आहे, याची या अनुभवाने मला पुन्हा जाणीव करून दिली. ज्या जगाचा भाग होण्याचे स्वप्न मी नेहमीच पाहिले आहे, त्या जगाचा अनुभव घेण्याची संधी दिल्याबद्दल केटीएम इंडियाचे आभार.